


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ | अंक : २८ | सोमवार दि. ०५ जुलै २०२१ ते रविवार दि. ११ जुलै २०२१ | पाने : ४ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्हांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

## 'यूट्यूब'वाल्यांच्या ब्लॅकमेलिंगवर कोण घालतोय पडदा?
## सावधान!! बोगस पत्रकार पाडताहेत पत्रकारीतेचा मुडदा

वसई/सोनू जाधव

पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. तसेच त्याच बरोबर तो जनता आणि सरकार यांच्यातील सुसंवादाचा एक महत्वाचा दुवा आहे. समाजातील बऱ्या वाईट घटनांचा पंचनामा करून पिडीतांना न्याय मिळवून देण्याची ताकत प्रसार माध्यमांमध्ये आहे. पण आज मात्र या क्षेत्रात काही बोगस पत्रकार शिरलेले असल्याने आणि पत्रकारितेचा धाक दाखवून ते वेगवेगळ्या क्षेत्रातील लोकांना ब्लॅकमेल करून त्यांच्याकडून पैसे उकळत असल्याने जे सच्चे अधिकृत आणि बुद्धीजीवी पत्रकार आहेत त्यांची विश्वसनीयता सुद्धा धोक्यात आलेली आहे. सध्या यु-ट्युब चॅनल आणि व्हेबपोर्टलचे पेव्ह फुटलेत. तसेच नोंदणीकृत नसलेली तसेच वर्ष सहा महिन्यातून केंव्हातरी निघणाऱ्या साप्ताहिकांचे ओळखपत्र घेऊन व्यावसायिकांना धमक्या देवून त्यांच्याकडून पैसे उकळण्याचे धंदे सुरु झालेत आणि यात यु-ट्यूबवाले आघाडीवर आहेत.




● तहसील कार्यालयात धिंगाणा घालून सरकारी कामकाजात अडथळा आणणाऱ्या यूट्यूब चॅनल व साप्ताहिकाच्या काही स्वयंघोषित पत्रकारांच्या विरोधात वसई पोलीस ठाण्यात दाद मागण्यास निघालेले नायब तहसीलदार व तहसील कार्यालयातील कर्मचारी वर्ग.

वास्तविक नुकत्याच केंद्र सरकारने जारी केलेल्या एका आदेशानुसार यु-ट्युब चालवणाऱ्यांना बेकायदेशीर ठरवण्यात आले असून त्यावरील आधारहीन आणि बदनामीकारक बातम्या माहिती आणि प्रसारण कायद्यातील नियमानुसार फौजदारी स्वरूपाच्या कारवाईस पात्र ठरू शकतात आणि म्हणूनच आता पोलिसांनी याबाबत यु-ट्युब चालणाऱ्यांकडे लक्ष देवून त्यांच्यावर कारवाई करायला हवी. तसेच यु-ट्युबच्या माध्यमातून जर कुणी एखाद्याला ब्लॅकमेल करीत असेल किंवा सरकारी कामात अडथळे आणीत असेल तर अशा यु-ट्युबवाल्यांवर तत्काळ फौजदारी स्वरुपाची कारवाई करायला हवी. यु-ट्युब चॅनलच्या माध्यमातून सुरु असलेला ब्लॅकमेलींगचा हा धंदा खऱ्या आणि नोंदणीकृत वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींसाठी तापदायक ठरत असल्याने जनमानसात चांगल्या पत्रकारांची बदनामी होत आहे. त्यामुळे पत्रकारांच्या ज्या संघटना आहेत त्यांनी आता याबाबत आवाज उठवायला हवा. कारण नोंदणीकृत नसलेली साप्ताहिके आणि पूर्णपणे बेकायदेशीर असलेले यु-ट्युब चालवणाऱ्यांनामुळे ...पान २ वर

## सासरच्या लोकांनी तिचा भयंकर छळ केला
## संपत्तीच्या वादात पुतळाबाईचा जीव गेला

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी



मयत पुतळाबाई

आजकाल लोकांना धन संपतीचा इतका मोह होतोय कि याच मोहापायी माणसे रक्ताची नातीही विसरायला लागलीत. आई, बाप, भाऊ, बहिण, पत्नी, पती, दीर हि सगळी नाती पैसा आणि संपत्तीच्या वादात केंव्हाच वाहून गेलीत. उरलाय तो फक्त धन लोबी माणूस. जो पैसा आणि संपत्तीसाठी केंव्हाही रक्ताच्या नात्याचा खून करू शकतो. स्वामी समर्थाच्या पवित्र अक्कलकोटमध्ये संपत्तीच्या वादातून पुतळाबाई या महिलेची तिच्या सासरच्या लोकांनीच हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी पती, दीर व जावेला अटक केली असून दोन आरोपी फरार आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट शहरातील एका कुटुंबात प्रॉपर्टीच्या वादातून पत्नीचा कुटुंबातील तिघांनी मिळून गळा दाबून खून केला आहे. पुतळाबाई शिवराज मलगोंडा (वय ३३ रा हंनूर नाका ता अक्कलकोट जि सोलापूर) असे मयत ...पान ६ वर

## माता न ती वैरिणी कसा असेल लळा
## नवजात अर्भकाचा तिने आवळला गळा

लातूर/करकरे अंबादास

अनैतिक संबंध क्षणिक सुखासाठी सुखद असतात आणि एकदाका माणसाला त्याची चटक लागली कि मग ती स्त्री असो किंवा पुरुष त्यांना कुणाची हि परवा नसते. ते आपल्याच धुंदीत असतात. पण निसर्ग जेंव्हा आपले रूप दाखवून त्यांचे पाप जगासमोर आणतो. तेंव्हा मात्र पापाची निशाणी त्यांना नकोशी होते आणि त्यातूनच जन्मदाती आई कैदाशीण होऊन आपल्याच पोटच्या गोळ्यासाठी काळ बनते. आर्वी गायरान शिवारातील महसूल कॉलनीत अशाच एका विधवा निर्दयी मातेने आपल्या नवजात अर्भकाचा गळा दाबून जीव घेतला. या घटनेनंतर फरारी झालेल्या त्या महिलेला पोलिसांनी अटक केली असून तिने आपला गुन्हा कबुल केला आहे.



दि.२८ जून २०२१ रोजी सांयकाळी पाच वाजण्याच्या सुमारास एमआयटी मेडिकल कॉलेज समोरील मौजे आर्वी गायरान शिवारातील महसूल कॉलनीतील एका पडक्या बाधंकामात एका बेवारस अर्भक आढळून आल्याची वार्ता लातूर शहरात वाऱ्यासारखी पसरली. आर्वी गायरान परीसरात राहत आसलेल्या लोकांनी घटनस्थळी बरीच गर्दी केली होती. त्या अर्भकाला पाहून लोकात तर्क विर्तकाला उधाण आले होते. बहूतेक एक - दोन दिवसापसून ते अर्भक तेथे आसलयाचा अंदाज लोकांकडून वर्तविण्यात येत होता. त्या परीसरात राहणाऱ्या दक्ष नागरीकांनी एमआयडीसी पोलिसांना संबधीत माहीती सांगितली. माहीती मिळताच एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजिवन मिरकले यानी आर्वी व पाखरसंगावी गावचे बिट अंमलदार गणेश कदम यांना सदरील अभृकाविषयी माहीती देवून तात्काळ घटस्थळाडे ...पान २ वर

## पत्नी नांदायला येत नसल्याने पती चिडला
## सासुरवाडीत जावून तिचा मुडदाच पाडला

जळगाव/क्राईम रिपोर्टर



मयत पुजा

शिघ्रकोपी माणूस खूप घातकी असतो. कारण एकदा का तो संतापला कि मग रागाच्या भरात तो काय करील याचा नेम नाही. जळगावमध्ये राहणारा सुनील पवार हा सुद्धा असाच शिघ्रकोपी होता. पत्नीच्या चारित्र्यावर त्याला संशय असल्याने तो पत्नीला माहेरी सुद्धा पाठवत नव्हता. पंचुलात भावाच्या लग्नाच्या निमित्ताने त्याची पत्नी माहेरी गेली ती परतलीच नाही. त्यामुळे चिडलेल्या सुनीलने सासुरवाडीत जावून पत्नी व मेव्हण्यावर प्राणघातक हल्ला केला. यात पत्नीचा मृत्यू झाला, तर मेव्हणा गंभीर जखमी झाला. दरम्यान या प्रकरणी सुनीलच्या सासुरवाडीतील लोकांनी त्याला बेदम चोप देवून पोलिसांच्या ताब्यात दिले.



आरोपी सुनिल







सुनिल बळीराम पवार हा अल्पशिक्षीत तरुण होता. जेवढे त्याचे शिक्षण तेवढी त्याची बुद्धी होती. जळगावच्या शिवाजी नगर गेंदालाल मिल भागात तो रहात होता. त्याचा स्वभाव मुळातच रागीट आणि खुनशी प्रकारातील होता. लग्नापुर्वी तो एका होलसेल वस्तूंच्या दुकानावर डिलेव्हरी बॉय म्हणून कामाला होता. कामाला असलेल्या दुकानावर त्याचे मन काही रमले नाही. काही दिवसातच त्याने दुकानावरील डिलेव्हरी बॉयची ...पान २ वर

## दारुड्या ट्रक चालकाच्या संसाराची होळी झाली
## पत्नी आणि मुलीला ठार मारुन आत्महत्या केली

अमरावती/क्राईम रिपोर्टर



कोरोनाच्या काळात लॉकडाऊन लागल्यामुळे अनेक उद्योग धंदे बंद झाले. परिणामी लाखो कामगारांवर बेरोजगार होण्याची पाळी आली. याच बेरोजगारीतून अनेकांना नैराश्य आले आणि त्यांना दारूचे व्यसन लागले आणि माणसाला एकदाका दारूचे व्यसन लागले कि मग दारूच्या नशेत तो मानसिक संतुलन हरवून बसतो. अशा वेळी त्याच्या हातून काहीही घडू शकते. अमरावती जिल्ह्यातील भामोड गावात नोकरी गेल्याने दारूच्या आहारी गेलेल्या एका ट्रक चालकाने पत्नी व तरुण मुलीची हत्या करून स्वतःही आत्महत्या केली. या घटनेमुळे गावात मोठी खळबळ माजली आहे, त्याची धाकटी मुलगी मामाच्या गावी गेली होती म्हणून बचावली.

पत्नीची आणि आपल्या १६ वर्षीय मुलीची हत्या करून पतीनेही गळफास लावून आत्महत्या केली आहे. ही धक्कादायक घटना अमरावतीच्या दर्यापुर तालुक्यातील भामोद या गावात उघडकीस आली आहे. दर्यापूर तालुक्यातील येवदा पोलीस ...पान २ वर

## पत्नी असताना जडले दुसरीवर प्रेम
## चिडलेल्या मामाने केला भाच्याचा गेम

जत/क्राईम रिपोर्टर

अति तिथे माती अशी एक म्हण आहे आणि ती खरीच आहे. कारण काही लोक इतके अति शहाणे असतात कि आपण काहीही केले तरी आपले कुणीच वाकडे करू शकत नाही असा त्यांना भ्रम असतो. अशावेळी त्यांच्यावर एखाद्याने उपकार केले तरी त्या उपकाराची त्यांना जाणीव राहत नाही आणि त्यांची हीच मुजोरी कधीतरी त्यांच्यासाठी प्राणघातक ठरते. खिलारवाडीतील नाना लोखंडे याच्या बाबतीतही असेच घडले. नानाच्या मामाने नानाला वेळोवेळी मदत केली. तसेच आपल्या मुलीशी त्याचे लग्न लाऊन दिले. पण नानाने मात्र मामाच्या उपकाराची जाणीव न ठेवता नात्यातल्या दुसऱ्याच मुलीशी सुत जुळवले आणि पत्नीला तिच्या माहेरी पाठवून दिले. त्यामुळे चिडलेल्या मामाने भाच्याचा जीव घेऊन त्याला कायमची अद्दल घडवली. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.





मयत किरण

जत तालुक्यातील खिलारवाडी येथील नाना लोंखडे हा मंगळवार दि.२२ जून पासून बेपत्ता असल्याची तक्रार त्याचा भाऊ धानू लोखंडे याने जत पोलीस ठाऱ्यात नोंदवली होती. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना बेपत्ता नाना याचे मोबाईल कॉलचे लोकेशन ते तपासात होते. त्यावेळी त्याच्या मोबाईलचे लोकेशन हे कर्नाटकातील विजापूर येथील तोरवे गाव हे दाखवित होते. तो बेपत्ता होऊन सात आठ दिवस झाले तरी त्याचा पत्ता काही लागत नसल्याने पोलीस ही चक्रावून ...पान २ वर

## ज्याने दिला सहारा त्याच्या बहिणीला पटवले
## रेती माफियाने मित्राला दुनियेतूनच हटवले

यवतमाळ/क्राईम रिपोर्टर



मैत्रीत माणसाने कधीही गद्दारी करू नये. ज्याने गद्दारी केली त्याला कधीनाकधी मित्राच्या रोषाला सामोरे जावे लागते आणि कदाचित त्यात त्याचा जीवही जातो. असाच काहीसा प्रकार यवतमाळमध्ये रेती सम्राट म्हणून प्रसिद्ध असलेल्या अक्षय राठोडच्या मित्राच्या बाबतीत घडला. अक्षयने करण परोपटे या मित्राला आपल्या धंद्यात आणले. पण त्याने मैत्रीत गद्दारी करून अक्षयच्या बहिणीशी सुत जुळवले. तिच्याशी प्रेमविवाह केला. आपल्या बहिणीला आपल्या पासून हिसकावून घेणारा करण उद्या आपला धंदाही आपल्यापासून छीणून घेईल या भीतीने अक्षयने तुरुंगातूनच करणच्या हत्येचा प्लान केला आणि त्याची हत्या घडवून आणली. या प्रकरणी पोलिसांनी हत्येतील आरोपींना अटक केली आहे.

अक्षय राठोड हा यवतमाळ शहर व परिसरात रेतीसम्राट म्हणून कुविख्यात होता. बाभुळगाव तालुक्यातील रेती ...पान २ वर

## दारूसाठी मैत्रीला त्यांनी बाजूला सारले
## मित्रांनीच मित्राला दगडाने ठेचून मारले



कराड/क्राईम रिपोर्टर

दारूची पार्टी म्हटली कि त्यात वादविवाद होताच असतात. कारण दारूची नशा एकदा का डोक्यात शिरली कि मग माणसाला त्याची शुद्ध राहत नाही आणि त्यातून वादावादी होऊन प्रकरण हाणामारी पर्यंत जाते आणि या हाणामारीत एखाद्याचा जीवही जातो. कराडच्या चौडेंश्वरी नगरात असेच तीन मित्र दारू प्यायला बसले होते. पण त्यातील दोघांना आणखी दारू प्यायची होती. त्यामुळे त्यांनी आपल्या तिसऱ्या मित्राकडे दारूसाठी पैसे मागितले, पण त्याने नकार देताच दोघांनी मिळून दगडाने ठेचून त्याची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. ...पान ६ वर

## वासनांध नराधमाना लाज लज्जा कुठली
## सावत्र बापाने तरुण मुलीची अब्रू लुटली

जळगाव/क्राईम रिपोर्टर

वासनांध माणूस स्त्रीसुखाला इतका चटावलेला असतो कि कधी कधी त्याला नात्याचे सुद्धा भान राहत नाही. आणि जिथे रक्ताच्या नात्याला डाग लावला जातो तिथे सावत्र नात्याचे काय? जळगाव येथे जिम चालवणाऱ्या एका इसमाची त्याच्या सावत्र मुलीवर वाईट नजर होती आणि एकेदिवशी घरात कुणीही नसताना त्याने तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर तो तीचे लैंगिक शोषण करू लागला. तसेच याबाबत कुणाला काही सांगितल्यास तुझ्या आई आणि बहिणीला ठार मारीन अशी त्याने धमकी दिली. मात्र एकेदिवशी तिने धीर करून हा प्रकार आपल्या आजी आजोबाना सांगताच त्यांनी पोलीस ठाण्यात जाऊन आपल्या जावया विरुद्ध बलात्काराची फिर्याद नोंदवली. त्यानंतर पोलिसांनी या नराधम सावत्र बापाला अटक केली.

महिमा (काल्पनिक नाव) आपल्या आईसोबत पुणे येथे रहात होती. महिमा तेरा वर्षाची असतांना सन २०१४ मधे तिच्या आईच्या जिवनात एक टर्न आला. त्यावेळी प्रसंगानुरुप तिच्या आईला दुसरे लग्न करावे लागले. महिमाच्या आईने जळगाव येथील गोविंदा (काल्पनिक नाव) नावाच्या तरुणासोबत दुसरे लग्न ...पान ६ वर

## गुन्हेगारी वाढली कोरोनाच्या संकटकाळी
## पोलिसांनी पकडली मुले पळवणारी टोळी



कल्याण/राजेंद्र वेदांते

कोरोन आणि कठोर निर्बंध यामुळे सर्व शासकीय यंत्रणा कोरोन निर्मूलनाच्या कामात गुंतलेली असताना त्याचा फायदा आता गुन्हेगार घेऊ लागले आहेत. परिणामी गुन्ह्यांच्या संखेत दिवसेंदिवस वाढ होत असून कल्याणच्या महात्मा फुले पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी नुकतेच एका मुले पळवणाऱ्या टोळीच्या मुसक्या आवळून त्यांनी फुटपाथवर राहणाऱ्या एका महिलेच्या चोरी झालेल्या सहा महिन्याच्या बाळाची सुखरूप सुटका केली आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे या पाच जणांच्या टोळीचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले. ...पान ६ वर

CMYK

## पान १ वरून....

### ‘यूट्यूब’वाल्यांच्या ब्लॅकमेलिंगवर कोण...

पत्रकारितेच्या अस्तित्वावरच प्रश्चचिन्ह निर्माण झाले आहे. सध्या संपूर्ण महाराष्ट्रातच बोगस पत्रकारांचा सुळसुळाट झाला आहे आणि तो थांबवण्यासाठी आता अधिकृत पत्रकारांनी पुढे येवून सरकारच्या निदर्शनास या गोष्टी आणून द्यायला हव्यात. कारण यातून गुन्हेगारीला चालना मिळत आहे. खंडणीखोरीचे प्रकार वाढायला लागले आहेत. कुठलाही आलतू-फालतू माणूस कुठले तरी प्रेस कार्ड घेऊन सरकारी कार्यालयात जाऊन कर्मचाऱ्यांना धमकावून त्यांच्या कामात अडथळे आणीत आहे. वसईमध्ये अशाच एका घटनेत तहसील कार्यालयातील सेतू विभागात घुसून काही साप्ताहिक आणि यु-ट्युब चॅनलच्या पत्रकारांनी धुडघूस घातला. तिथल्या खाजगी कर्मचाऱ्यांना ओळखपत्र दाखवा अशी दमदाटी करू लागले. त्यामुळे वसई तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी वसई पोलीस ठाण्यात जावून तिथे पोलिसांकडे आपल्याला होणाऱ्या त्रासाची फिर्याद नोंदवली. त्यानंतर तिथल्या पोलीस अधिकाऱ्यांनी आपल्या वरिष्ठांशी संपर्क साधून त्रास देणाऱ्या पत्रकारावर खंडणी आणि सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल केला. तर वसई येथील सातीवली येथील एका कंपनीमध्ये कुठल्यातरी साप्ताहिकाचे प्रेस कार्ड दाखवून पैसे उकळण्यासाठी गेलेल्या बोगस पत्रकाराला त्या कंपनी मालकाने पकडून त्याची चौकशी सुरु करताच त्या बोगस पत्रकाराची बोबडी वळली आणि तो त्या कंपनी मालकाच्या पाया पडून गयावया करू लागला. या बाबतचा एक विडिओ व्हायरल झाला असून तो बघून सच्चा पत्रकारांची मान शरमेने खाली झुकली आहे. या अशा लोकांमुळेच आता पत्रकारांचा कुणाला धाकही राहिलेला नाही आणि पत्रकारांना कोण मान सन्मानही द्यायला तयार नाही. केंद्र सरकारने जर यु-ट्युब चॅनल बेकायदेशीर असल्याचे जाहीर केलेय. तर त्याचे पत्रकार लोकांना ब्लॅकमेल करीत कसे फिरतात पोलिसांना हे दिसत नाही का? किंवा सरकारी कार्यालयातील कर्मचारी तरी अशा बोगस पत्रकारांना का घाबरतात आणि सर्वात महत्वाचे म्हणजे पत्रकारांच्या संघटना झोपल्या आहेत का? कि त्यांच्यातही काही बोगस पत्रकार आहेत म्हणून ते डोळे मिटून बसलेत. आता या सगळ्या गोष्टींची चौकशी आणि सोक्ष मोक्ष लावण्यासाठी पत्रकारांनी पुढाकार घ्यायला हवा. काही लोक आपल्या मोटार सायकलवर प्रेसचा स्टीकर लावून फिरतात. पण ते खरोखरच पत्रकार आहेत कि नाहीत हे जाणून घेण्याची आवश्यकता वाहतूक पोलिसांना वाटत नाही. उद्या जर एखाद्याने दरोडा घातला किंवा खून अथवा बलात्कार करून प्रेसचा स्टीकर लावलेल्या गाडीवरून पाळला, तर त्याला कुठे शोधणार? त्यामुळे सर्वात प्रथम गाड्यांवर प्रेसचा स्टीकर लावणे बंद करण्याचा सरकारने कायदा करावा. जर मंत्र्यांच्या गाडीवरचा लाल दिवा रद्द होऊ शकतो, तर गाड्यांवरचे प्रेसचे स्टीकर कशासाठी. वसई, विरार, नालासोपारा या भागात यु-ट्यूब आणि साप्ताहिकांचे बोगस पत्रकार यांचा सुळसुळाट झाला असून यातील बहुतेक पत्रकार हे परप्रांतीय आणि खास करून युपी-बिहारचे आहेत. त्यायील काहीना पत्रकारितेतील क कि ढ सुद्धा ठाऊक नाही. या देशाच्या राष्ट्रपतींचे नाव विचारले तर तेही त्यांना सांगता येणार नाही. अशा लोकांच्या हाती प्रेस कार्ड आल्याने आणि पत्रकारांच्या संघटनाही डोळे मिटून हे सगळं पाहत असल्याने खऱ्या, अधिकृत आणि बुद्धीजीवी पत्रकाराचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. हे जर असेच चालू राहिले तर लोकशाहीचा हा चौथा स्तंभ कधी कोसळेल याचा नेम नाही. जर यु-ट्युब चॅनल बेकायदेशीर असल्याचे खुद्द केंद्र सरकार सांगत असेल तर पोलीस आता कुणाच्या आदेशाची वाट बघत आहेत. सरकारनेही या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष करू नये. नाहीतर या भामट्या पत्रकारांमुळे खऱ्या पत्रकारांना समाजात काम करणे आणि जगणेही मुश्कील होईल.

### माता न ती वैरिणी कसा असेल...

रवाना होण्याचे आदेश दिले. घटनेचे गांर्भिय ओळखून एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोउपनि कल्याण नेहरकर, पोउपनि संदीप कराड, पोह. बेल्लाळे ,पोना. गिरी ,पोका. बोपले घटनास्थळाकडे रवाना झाले. काही वेळात एमआयडीसी पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांना पाहताच काही जणांनी घटस्थळावरून काढता पाय घेतला. पोलिसांनी उपस्थित लोकांकडून घटनेची प्राथमिक माहीती घेतली. सदरची जागा ही महसुल कॉलनी मधील सौ.जयश्री विनायक पवार यांच्या मालकींची असून त्याचा सर्व न. ३३ गट क्रं ७१ प्लॉट क्र ०५ मधील रिकाम्या प्लॉट मध्ये एक अर्धवट बांधकाम केलेले पडीक पूर्वमुखी रुम असुन सदर रूम मध्ये दक्षिण भिंती लगत कोप-यात एक नवजात अर्भक ज्याचे गळयाला पिवळ्या रंगाचे काठ असलेले साडीचे फडक्याने गाठ मारलेली दिसत होती. अर्भक मृत आस्थेत होते. अर्भक अर्धवट कुजलेल्या आवस्थेत आसल्याने ते अर्भक पुरूष जातीचे आहे का स्त्री जातेचे आहे यांचा अंदाज घेणे कठीण होते. एमआयडीसी पोलिसांनी सर्व बाबींचा आभ्यास करून पंचनाम्याला सुरूवात केली. एमआयडीसी पोलिसांनी काही पुरावा सापडतो का या उद्देशाने घटनास्थळाचा सगळा परीसर पिंजून काढला. घटनास्थळावरील आवश्यक ती माहीती गोळा केली. दोन शासकीय पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा आटोपला. अंधार पडत असल्याने सदर अर्भक नेण्याकरीता ॲम्बुलन्स बोलावुन घेतली. अर्भकाचे प्रेत उत्तरणीय तपासणीसाठी शासकीय रूग्णालयात पाठविण्यात आले. वैद्यकीय अवहालानंतर तया अर्भकाचा मृत्यू कसा झाला याचा उलगडा होणार होता. ते अर्भक कोणी व काय करणाने आणून टाकले रूांचा प्रश्न पोलिसांना पडला होता. सकाळी शवविच्छेदानानंतर सदर अर्भक हे स्त्री जातीचे असून त्याचा गळा आवळून खून केल्याची धक्कादायक माहीती पोलिसांना मिळाली. या खून प्रकरणाचा छडा लावण्यासाठी पोलिस तपासाचे चक्र गतिमान केले. सकारी फिर्यादीवरून एमआयडीसी पोलिस ठाण्यात अज्ञात मारेकऱ्या विरोधात गुरनं. ३८५/ २०२१ कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल केला. जिल्हा पोलिस अधिक्षक निखील पिंगळे, अप्पर पोलिस अधिक्षक हिम्मत जाधव, उपविभागीय पोलिस अधिकारी जितेंद्र जगदाळे, एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजिवन मिरकले यांच्या मार्गादर्शनाखीली तपासाचे सर्व सुत्र पोलिस उपनिरीक्षक गणेश कदम यांच्या हाती देण्यात आले. एमआयडीसी पोलिसांनी या खून प्रकरणाचा उलगडा करण्यासाठी पोलिसांचे पथक तयार करून लातूर शहरासह आर्वी परीसरातून गुप्त माहीती हास्तगत करण्यास सुरूवात केली. शहरातील प्रत्येक दवाखान्यातून प्रसुती झालेल्या नोंदी स्तिगत केल्या. पोलिस सगळया बाजूनी अभ्यास करून तपासाची दिशा ठरवत होते मात्र पोलिसांना ठोस माहीती हाती लागत नव्हती. दरम्यान एका गुप्त बातमीदारांकडून स्त्री अर्भकाचा खून करून पुराव नष्ठ करण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका संशयीत महीली आर्वी गायरान शिवारात आसल्याची माहीती मिळाली. पोलिसांनी तपासाचे चक्र गतिमान करून सदरील संशयीत महीलेचे गुप्त माहीती घेतली असता. आर्वी गायराण शिवारात राहणारी कलावती ( बदललेले नाव ) नावाची महीला गरोदर होती ती सध्या दिसत नाही. अशी खात्रीशीर माहीती समोर आली. पोलिसांनी संबधीत महिलेची प्राथमिक माहीती घेवून तिचा शोध सुरू केला. काही तसातच एमआयडीसी पोलिसांनी कलावती या संशयीत महिलेला ताब्यात घेवून अधिक विचारपुस केली.सुरूवातीना तिने पोलिसांना असमाधानकारक उत्तरे दिली. महिला पोलिसांनी तिला विश्वासात घेवून अधिक विचापुस केली असता तिने आपल्या गुन्ह्याची कबूल दिली. स्वतः एका स्त्री जातीच्या बाळाला जन्म देवुन त्या बाहाचा साडीच्या फडक्याने गळा आवळुण जिवे ठार मारले आसल्याचा कबूली जबाब दिला. पोलिसांनी आरोपी कलावतीची अधिक माहीती जाणून घेतली असता गेल्या दाहा बारा वर्षापुर्वी तिचे लग्न झाले होते. लग्नानंतर तिचा संसार सुखात चालला होता. तिला पाच अपत्यही झाले होते. मात्र अर्ध्यावर नऱ्याने कायमची साथ सोडली. देवाघरी गेलेल्या पतीचा विरह कलावतीने काही वर्षच केला. कलावती आपल्या लेकारांसह राहत होती. दरम्यान पाच वर्षापुर्वी तिचे एकाशी सुत जुळले होतो. त्यातूनच हे अर्भक जन्माला आले का? या अर्भकाच्या खून प्रकरणात अन्य कोणाचा सहभाग आहे का? याचा पोलिस तपास करीत आहेत.

### पत्नी नांदायला येत नसल्याने पती...

नोकरी सोडून दिली. काही दिवस भटकंती केल्यानंतर त्याला जळगाव महानगरपालिकेत रोजंदारी स्वरुपात कंत्राटी कामगार म्हणून काम मिळाले. दरम्यान त्याचे लग्नाचे वय देखील झाले होते. जळगाव पासून जवळच असलेल्या पाळधी येथील पुजा नावाच्या तरुणीसोबत त्याचा विवाह ठरला व पार पडला. लग्नानंतर देखील सुनिलचा रागीट स्वभाव तसाच राहिला होता. चार बहिणी व एक भाऊ असलेली पुजा आता सुनीलची पत्नी म्हणून पाळधी सोडून जळगावला सासरी आली होती. नव्याने लग्न झाले असल्यामुळे तिने सुनिलचा स्वभाव सुरुवातीच्या काळात बराच सहन केला. या कालावधीत सुनिल व पुजा यांच्या संसारवेलीवर देवाघरची दोन फुले उमलली. एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये दोघांच्या संसारात आली होती. ओम आणि भाग्यश्री अशी त्यांनी दोघा मुलांची नावे ठेवली. बघता बघता दोन्ही मुले मोठी होत गेली. ओम हा दहा वर्षाचा तर भाग्यश्री ही सात वर्षाची झाली होती. दोन मुले झाल्यामुळे सुनिलच्या तापट स्वभावात काहीतरी बदल होईल असे पुजाला वाटत होते. मात्र त्यात काहीच परिवर्तन झाल्याचे तिला दिसून येत नव्हते. उलट तो तिच्या चारीत्र्यावर संशय घेऊ लागला. सुनिल आपल्या चारित्र्यावर संशय घेत असल्याचे बघून पुजाला साहजिकच त्याचा राग आला होता. मात्र तरी देखील तिने त्याला सुरुवातीला चांगल्या शब्दात समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र तो तिच्या चारित्र्यावर जास्तच संशय घेऊ लागला. त्यामुळे पती पत्नीच्या शब्दामागे शब्द वाढतच होता. पती पत्नीच्या या वादाचा थेट परिणाम त्यांच्या दोघा मुलांच्या मनावर होत होता. मात्र सुनिलला त्याचे काहीही सोयरसुतक नव्हते. तो मुलांसमोरच पुजाला अश्लिल शब्दात बोलून तिच्या चारित्र्यावर संशय घेण्याचे काम करत होता. संशयाने पछाडलेला सुनिल तिला माहेरी पाळधी येथे देखील जाऊ देत नव्हता. त्यामुळे पुजाच्या मनाची मोठ्या प्रमाणात घुसमट होत असे. १८ फेब्रुवारी रोजी पुजाचा चुलतभाऊ मंगेश चव्हाण याचे पाळधी येथे लग्न ठरले. या लग्नानिमीत्त सासरकडील लोकांनी जावयाचे नाते असलेल्या सुनिल यास घरी येऊन चुलत शालकाच्या लग्नाला येण्याचे निमंत्रण दिले. मात्र पुजाचा राग मनात असल्यामुळे सासरी जायचे नाही असे त्याने मनाशी ठरवले होते. तो चुलत शालक मंगेशच्या लग्नाला गेलाच नाही. मात्र लग्नाच्या निमीत्ताने माहेरी जाण्याची संधी पुजाला मिळाली होती. ती मुलांना सोबत घेऊन माहेरी पाळधी येथे निघून आली. सुनिल मात्र घरीच होता. लग्नाच्या निमित्ताने पाळधी येथे गेलेली पूजा पुन्हा सासरी येण्याचे काही केल्या नावच घेत नव्हती. त्यामुळे त्याच्या संतापात मोठी भर पडली होती. तिच्या चारित्र्यावर सुरुवातीपासून तो संशय घेत होता. दरम्यानच्या कालावधीत पती पत्नीत वादाच्या कुरबुरी सुरुच होत्या. पूजा जळगावला येण्याचे नाव घेत नसल्यामुळे त्याने पत्नी हरवल्याची तक्रार पोलिस स्टेशनला मुद्दाम दाखल केली. आपला पती आपल्याला मानसिक त्रास देत असल्याबाबत पुजाने पाळधी येथील दुरक्षेत्रात तक्रार दाखल केली होती. तिच्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल करुन त्याला समज देण्यासाठी बोलावणे पाठवले. पुजाने आपली पोलिसात तक्रार दाखल केल्याचे समजताच त्याचा तिच्यावरील राग अजूनच वाढला. तो पाळधी येथे आला मात्र पोलिसांकडे गेला नाही. तो तिच्या पाळतीवर होता. त्याने एक चाकू देखील विकत घेतला. अखेर पुजाच्या जिवनातील तो अखेरचा दिवस जवळ आला. २३ जून रोजी दुपारी एक ते दिड वाजेच्या सुमारास पुजा, तिची नाशिक येथील चुलत बहिण उर्मिला व दहा वर्षाचा मुलगा ओम यांच्यासोबत मारवाडी गल्लीतील खुशी श्रृंगार शॉपी येथे वस्तू खरेदीसाठी गेले होते. दुकानातून तिघे जण घराच्या दिशेने जाण्याच्या बेतात होते. तेवढ्यात पूजाच्या मागावर टपून बसलेला सुनिल तेथे दाखल झाला. आल्या आल्या त्याने पूजाला शिवीगाळ करत चापटाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. आपल्या चुलत बहिणीला भर रस्त्यात चारचौघात होत असलेली मारहाण उर्मिलास बघवली गेली नाही. तिने या निंदनीय प्रकारापासून सुनिल यास परावृत्त करण्याचा पुरेपुर प्रयत्न केला. मात्र तिला त्यात अपयश आले. संतप्त झालेल्या सुनिलने पुजाचा गळा आवळण्यास सुरुवात केली. गळा आवळला जात असल्यामुळे ती जवळच असलेल्या ओट्यावर पडली. गळा दाबून देखील पुजा जिवंत असल्याचे बघून सुनिलचा संताप अजूनच वाढला. त्याने खिशातील चाकू बाहेर काढला. आपण संतापाच्या भरात काय करत आहोत याचे त्याला भान राहिले नव्हते. भान विसरुन त्याने पुजाच्या पोटावर, मानेवर, छातीवर आणि गळ्यावर सपासप वार करण्यास सुरुवात केली. हा प्रसंग अतिशय थरारक होता. त्यामुळे परिसरातील दुकानदारांनी आपापली दुकाने पटापट बंद केली. रस्ता काही क्षणातच जवळपास निर्मनुष्य झाला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेली पुजा जिवाच्या आकांताने जोरजोरात ओरडत होती. तिच्या वेदना तिला असह्य झाल्या होत्या. ती आपला जिव वाचवण्यासाठी लोकांच्या धावा करत होती. काही वेळापुर्वी आपल्यासोबत चांगली बोलणारी पुजा आता रक्ताच्या थारोळ्यात पडलेली बघून तिची चुलत बहिण उर्मिला प्रचंड भेदरली होती. तिच्याहून तिचा दहा वर्षाचा मुलगा तर प्रचंड भेदरला होता. आपल्या आईचा रक्ताच्या थारोळ्यातील पडलेला प्रसंग त्या लहान बालकाच्या मनावर कायमचा कोरला गेला. सुनिल हातातील चाकूसह पळून जात असल्याचे बघून उर्मिलाने जोरजोरात ओरडण्यास सुरुवात केली. मात्र तो चपळाईने संतापाच्या भरात पुजाच्या माहेरी गेला. त्याने पुजाचा भाऊ अर्थात त्याचा शालक शंकर भिका चव्हाण याच्यावर देखील चाकूचे वार केले. चाकूच्या वारात शंकर देखील मोठ्या प्रमाणात जखमी झाला. जमलेल्या लोकांनी पूजासह तिचा भाऊ शंकर या दोघांना जळगाव येथे वैद्यकीय उपचारासाठी सामान्य रुग्णालयात नेण्यात आले. मात्र पुजाचा जिव वाचू शकला नाही. तिच्या अंगावर चाकूचे जागोजागी घाव बसले होते. त्यामुळे ती मरण पावली होती. तिचा गंभीर जखमी भाऊ शंकर मात्र सुदैवाने बचावला होता. दरम्यानच्या कालावधीत जमलेल्या काही लोकांनी सुनिल यास पकडून बेदम चोप देत पाळधी दुरक्षेत्र येथे आणून पोलिसांच्या हवाली केले. पोलिसांनी त्याला आपल्या ताब्यात घेत पुढील कारवाईला सुरुवात केली. या घटनेची माहिती मिळताच उप विभागीय अधिकारी राकेश जाधव, धरणगाव पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अंबादास मोरे व पाळधी दुरक्षेत्रचे सहायक पोलिस निरीक्षक गणेश बुवा आदींनी आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेत योग्य ती कायदेशीर कारवाई सुरु केली. या प्रकरणी उर्मिला पवार हिच्या फिर्यादीनुसार धरणगाव पोलिस स्टेशन अंतर्गत पाळधी दुरक्षेत्र येथे सुनिल पवार याच्याविरुद्ध पूजा पवार हिच्या खूनासह शंकर पवार यास जखमी केल्याबद्दल फिर्याद दाखल केली. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. २३०/२०२१ भा.द.वि. ३०२, ३०७, ३२६, ३२४, ३२३, ५०४ नुसार दाखल करण्यात आला. पोलिस निरीक्षक अंबादास मोरे, सहायक पोलिस निरीक्षक गणेश बुवा यांनी आपल्या सहका-यांच्या मदतीने घटनास्थळाचा पंचनामा केला. जिल्हापेठ पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस उपनिरीक्षक किशोर पवार, नाना तायडे, योगेश साबळे, ललित भदाणे, अकबर तडवी यांनी रुग्णालयात जखमी शंकरकडून घटनेची माहिती घेत जबाब नोंदवला. पूजा व सुनील या पती-पत्नीमधील वादाची परिणीती खूनाच्या घटनेत परावर्तीत झाली होती. या घटनेमुळे पूजाची दोन्ही मुले पोरकी झाली. त्यांच्यावरील पित्याचे व मातेचे छत्र नाहीसे झाले. दोन्ही मुलांचा बाप जेलमधे तर आई देवाघरी गेली. सुनिल पवार यास अटक करण्यात आली. त्याला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने सुरुवातीला त्याला पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. या घटनेचा पुढील तपास पो.नि.अंबादास मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि.गणेश बुवा व त्यांचे सहकारी करत आहेत.

### पत्नी असताना जडले दुसरीवर...

गेले. त्यातच जत पोलीसांना विजापुर पोलीसाकडून माहिती मिळाली की, विजापूर पासून आठ दहा कि.मी. अंतरावर असणाऱ्या तोरवे गावाच्या हद्दीत ओढयाजवळ एका तरूणाचा मृतदेह मिळाला असून. त्याच्या डोक्यात दगड घालून त्याचा खून केला असून बहुदा तो जत तालुक्यातील बेपत्ता तरूण असावा. या माहितीवरून पोलीसांनी तोरवे येथील ओढयाच्या जवळ जावून पाहिले असता. तो तरूण बेपत्ता नाना लोंखडे हाच होता. मयताची ओळख नाना लोंखडे याचा भाऊ धानू याने पटवली होती. नाना लोखंडे याचा खून कुणी आणि कशासाठी केला याचा तपास पोलीस करत असताना त्यांना वेगळीच माहिती मिळाली होती. नाना लोखंडे याचे अपहरण त्याच्या सख्या मामानेच करून त्याचा खून केला होता. जत तालुक्यातील खिलारवाडी येथील नाना लोंखडे याला चार मामा असून सांगलीतील त्याचा मामा अर्जून शिंदे याने त्याला गेल्या काही दिवसापूर्वी आपल्या कॉन्ट्रक्टरच्या धंदयात मदत होईल या भावनेने सांगलीला आणले होते. यापूर्वी नाना हा खिलारवाडी गावातच पान शॉपचा धंदा करीत होता. अर्जून शिंदे यांनी त्याला सांगलीला आणल्यानंतर तो त्यांना त्याच्या व्यवसायात मदत करू लागला होता. त्यातच नाना याचे दुसऱ्या मामाच्या मुलीवर प्रेम बसल्याने अर्जून शिंदे यांनी स्वत: पुढाकार घेऊन त्याचे लग्न आपल्या भावाच्या मुलीशी लावून दिले. आतल्या आत लग्नाची नाती जुळल्याने दोन्ही कडचे कुंटूंब समाधानी होते. मात्र नाना हा जरा दिलफेक स्वभावाचा होता. त्याचे लग्न झाले असले तरी तारूण्य सुलभ भावनेनून त्याचे लग्नानंतर ही दुसऱ्या एका नात्यातील मुलीवर प्रेम बसले होते. तो त्या मुलीच्या नादाने अर्जून शिंदे याच्या व्यवसायकडे दुर्लक्ष करू लागला होता. अर्जून हा त्या मुलीशी फोनवरून तासन तास बोलून तिच्याशी चॅटिंग करू लागला होता.तो त्या मुलीला आपल्या बाईकवरून कॉलेजला नेत होता आणीत होता. या कारणातून त्याचे मामा अर्जून शिंदे याच्याशी सारखे भांडण होऊ लागले होते.नाना याने नादाला लावलेली दुसरी मुलगी म्हणजे अर्जुन शिंदे याच्या चुलत भावाचीच मुलगी होती. आपल्या भावाच्या मुलीबरोबर लग्न करून तो परत दुसऱ्या भावाच्या मुलीला नादाला लावतो आहे याचा राग अर्जुन शिंदे यांना येत होता. आपल्या भावाच्या मुलीचा संसार तो मोडत आहे. त्यामुळे त्यांनी नाना याला समजावून ही सांगितले होते. पण नाना हा उलट त्यानाच जीवे मारण्याची धमकी देऊन मामाच्या लग्न झालेल्या मुलीला सोडण्याची भाषा करत होता.तुमची मुलगी मला पंसत नाही, मी माझे प्रेम बसले आहे त्याच मुलीशी परत दुसरे लग्न करणार आहे यात कोण आडवे येईल त्याला मी संपवून टाकतो अशी अप्रत्यक्ष धमकी तो अर्जून शिंदे यांना देत होता. तरीही शिंदे हे गप्प होते. दोन चार वेळा समजावून सांगून ही नाना काही ऐकत नाही उलट आपल्या पुतणीला सोडण्याची धमकी देवून मलाच जीवे मारण्याची धमकी देत आहे म्हणून ते ही त्याचेवर चिडले होते. मामा भाच्यातील भांडण वाढले होते. दोघे ही एकमेकांना बघून घेण्याची भाषा करत होते. त्यातच नाना हा सांगलीतील अर्जून शिंदे याचे काम सोडून आपल्या मूळ गावी म्हणजे खिलारवाडी येथे राहयला आला होता. आता तो आपला पूर्वीचा पॉन शॉपचा व्यवसाय बघत होता.त्याने आपले म्हणणे खरे करून दाखवले होते. त्याने आपल्या सख्या मामाच्या मुलीला सोडून देवून दुसऱ्याच मुलीला नादाला लावले होते.त्याच्या सख्या मामाची मुलगी ही तिच्या माहेरी सांगली येथे परत आली होती.त्यातुनच अर्जून शिंदे हा नानावर चिडला होता.आपल्या मुलीचे जीवन बरबाद करतो त्याला आपण धडा शिकवलाज पाहिजे नाही तर तो उदया डोईजड होऊन आपल्याला मारून टाकेल याची भिती त्याला वाटत होती. गेल्या एक वर्षापूर्वी नानाने त्या मुलीला पळवून नेले होते. त्यावेळी अर्जुन शिंदे यांनी त्याला परत आणून मारहाण केली होती.त्यामुळे नाना हा अर्जुनवर तसा चिडूनच होता. आता नाना आपल्यावर सूड उगवेल अशी भिती त्यांना होती. नानाचे हे प्रेमप्रकरण भल्यातच वाटेला गेले होते. मामाच्या मुलीबरोबर लग्न करून ही त्याने परत नात्यातील दुसऱ्या मुलीला पळवून नेल्याने शिंदे याची अब्रु गेलेली होती. या भितीतूनच त्याने नाना याचा कायमचा काटा काढायचा असे ठरविले होते. त्यासाठी त्याने आपल्या इतर तिघा मित्रांची मदत घेण्याचे ठरविले.या कामासाठी त्याने नात्यातील म्हणजे खिालरवाडी येथील नानाच्या भावकीतील जगन्ननाथ लोंखडे व मिरजेजवळील सुभाष नगर येथील रावसाहेब लोंखडे त्याचबरोबर सुभाषनगर येथीलच विनायक शिंगाडे याची मदत मागितली. हे तिघे ही नानाची गेम करायला अर्जून शिंदे यांना मदत करायला तयार झाल्यावर त्यांनी एक प्लॅन केला.त्या प्लॅननुसार ते चौघे ही दि.२२जून रोजी खिलारवाडी येथे एका कारने गेले. त्यांनी गोड बोलून नाना याला त्याच्या कारमध्ये बसविले.नाना याला दारू पिण्याचे व्यसन असल्याने चल आपण सर्व जण मिळून आज पार्टी करूया असे त्याला सांगितले होते. नाना हा एकटा अर्जुन याला भारी पडला असता म्हणून अर्जुन यांनी या कामासाठी इतर तिघांची मदत घेतली होती. कारमध्येच दारू पित पित ते पाच जण विजापूर भागात आले.कर्नाटक महाराष्ट्र सिमेवर त्यांनी त्याची गेम करण्याचे प्लॅन केले होते. जत पासून विजापूर जवळ असल्याने कर्नाटक हद्दीत जावून त्याची गेम करायची आणि त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावायची असे त्यांनी ठरविले असल्याने ती कार त्यांनी रात्री ८ वाजणेच्या सुमारास विजापूर तिकोटा रोडवरील तोरवे गावाच्या हद्दीतील ओढयाजवळ आणले. सगळ्याना दारू फुल्ल चढली असल्याने याच संधीचा अर्जुन शिंदे यांनी फायदा घेत नाना याला तू दुसऱ्या मुलीच्या नादाला का लागला आहेस. आमच्या मुलीला तु का सोडत आहेस? असे विचारून त्याला मारहाण करायला सुरूवात केली. नाना लोंखडे हा अंगाने धष्टपुष्ट असल्याने तो एकटाला आवरणार नाही याची कल्पना त्यांना होती.अर्जुन यांनी विषयाला हात घातल्यावर इतर तिघांनी ही त्याला मारहाण करायला सुरूवात केली होती.रात्रीच्या अंधारात ओढया जवळील शेत शिवारातील रस्त्यावरील पुलावर त्यावेळी कुणी ही नव्हते. या चौघांनी ही त्याला जबर मारहाण करून खाली पाडले. त्याचवेळी रावसाहेब लोंखडे आणि अर्जून शिंदे यांनी त्याच्या डोक्यात जवळच पडलेला मोठा दगड घातला. त्याच्या डोक्याचा त्यांनी चेंदामेंदा केला होता. तो रक्ताच्या थारोळ्यात पडल्यावर ते चौघे ही तो मयत झाल्याची खात्री झाल्यावर घटनास्थळा वरून परतले होते. इकडे मंगळवार दि.२२ जून रोजी गेलेला नाना हा त्या रात्री व दुसऱ्या रात्री परत न आल्याने त्याचा भाऊ धानू याने जत पोलीसात आपल्या भावाचे अपहरण करून त्याला पळवून नेल्याची तक्रार अर्जुन शिंदे आणि खिलारवाडीतील जगन्नाथ लोखंडे याच्या विरोधात नोंदवली होती. पोलीस या घटनेचा तपास करत असताना त्यांना विजापूर येथील तिकोटा जवळील तोरवे गावच्या हद्दीत ओढयाजवळी रस्त्यावर एका तरूणचा मृतदेह पडला असल्याची माहिती मिळाली होती. मयत नाना लोंखडे याचे व संशयीत आरोपी अर्जुन शिंदे व रावसाहेब लोखंडे याचे मोबाईलचे लोकेशन हे विजापूर जवळील तोरवे गावच्या हद्दीत दाखवत असल्याने पोलीसांचा ही या दोघावरील संशय अधिकच बळावला होता. या घटनेतील संशयीत आरोपी हे पळून गेल्याने पोलीस त्याच्या मागावर होते. घटने नंतर चार पाच दिवसात जत पोलीसांना या संशयीत आरोपीचा ठावठिकाणा सापडला. दरम्यान पोलीसांनी तोरवे येथून मयत नाना लोखंडे याच्या मृतदेहाची ओळ्ख पटवून घटनास्थळाचा पंचनामा विजापूर पोलीसांच्या मदतीने करून मृतदेह ताब्यात घेतला. या घटनेतील संशयीत आरोपी अर्जुन शिंदे,जगन्नात्र लोखंडे आणि विनायक शिगांडे हे पोलीसाच्या गळाला लागले होते.पोलीसांनी त्यांना ताब्यात घेऊन त्याच्याकडे या घटनेची चौकशी करत असताना अर्जुन शिंदे यांनी पोलीसांना आपला गुन्हा कबुल करून सांगितले की, मयत नाना लोखंडे हा त्याचा भाचा असून त्याचे आपल्या भावाच्या मुलीबरोबर लग्न लावून दिले होते.त्याचा आपण पंधरा वर्ष सांभाळ केला होता. तरीही तो दुसऱ्या मुलीच्या प्रेमात पडून त्याने तिला नादाला लावून तिला पळवून नेले होते.आणि आपल्या भावाच्या मुलीला सोडून दिल्याने त्याचा खून आपण आपल्या इतर मित्राच्या मदतीने त्याच्या डोक्यात दगड घालून केला अशी कबुली दिली. मयत नाना लोखंडे याचा भावू धानू लोखंडे याने दिलेल्या फिर्यादीवरून जत पोलीसांनी नाना शिवाजी लोखंडे (वय २७) रा. खिलारवाडी याचा खून करून पुरावा नष्ट केले प्रकरणी अर्जून महादेव शिंदे (वय ४०) रा.अभिनंदन कॉलनी सांगली, जगन्नाथ बाळाप्पा लोखंडे (वय२३) रा.खिलारवाडी, आणि विनायक बाळाप्पा शिंगाडे (वय २१) रा.सुभाषनगर मिरज. आणि या घटनेती फरार आरोपी रावसाहेब लक्ष्मण लोखंडे (वय ३८) रा.सुभाषनगर मिरज याचे विरोधात जत पोलीसात भा.दं.वी. कलम ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा नोंदवला.या घटनेतील अर्जुन शिंदे, जगन्नाथ लोंखडे आणि विनायक शिंगाडे याना पोलीसांनी जत येथील न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने या तिघांना सात दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.पोलीस कोठडी दरम्यान या तिघांच्या कडून पोलीसांनी गुन्हयात वापरलेली कार जप्त केली.या घटनेचा तपास पोलीस उपअधिक्षक रत्नाकर नवले आणि पोलीस निरीक्षक आप्पासाहेब कोळी याच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. महेश मोहिते, पो.उप. निरी.युवराज घोडके, पोलीस नाईक बजरंग थोरात, सचिन ढाके, उमर फकीर, अमोल चव्हाण, प्रशांत गुरव,शरद शिंदे यांनी केला. या घटनेतील फरार आरोपी रावसाहेब लोखंडे याचा शोध कथा शब्द बध्द होईपर्यत पोलीस घेत होते. या घटनेचा पुढील तपास जत पोलीस करीत आहेत. नानाचे हे प्रेमप्रकरण भल्यातच वळणावर गेल्याने मामा भाच्यात वाद होऊन मामाने भाच्याच्या डोक्यात दगड घालून खून केला. राग आणि भीक माग अशीच अवस्था रस्ता सोडून वागणाऱ्याची होते हेच या घटनेवरून दिसून येते.

### ज्याने दिला सहारा त्याच्या बहिणीला...

घाटावर त्याचे साम्राज्य होते. त्याच्या परवानगीशिवाय त्याठिकाणी कुणी रेतीचा उपसा देखील करु शकत नव्हता. रेतीच्या व्यवसायात त्याने आपले वेगळे साम्राज्य निर्माण केले होते. रेती व्यवसायाच्या माध्यमातून त्याच्याकडे मोठ्या प्रमाणात लक्ष्मी आली होती. कुख्यात गुंडाचे वलय त्याच्या अवतीभोवती नेहमीच रहात होते. या व्यवसायातून पोलिसांचा ससेमिरा कमी व आर्थिक लाभ अधिक असे त्याचे गणित होते. काही दिवसातच रेतीच्या व्यवसायामुळे आर्थिकदृष्ट्या तुटलेल्या अक्षयची मोठ्या प्रमाणात भरभराट झाली. दरम्यानच्या कालावधीत अक्षयकडे करण परोपटे या तरुणाची उठबस वाढली. अक्षयसोबत मैत्री वाढवण्यात करण परोपटे यशस्वी झाला. त्यामुळे काही प्रमाणात रेतीचे ठेके करण याला देखील मिळू लागले. करण परोपटे याचे अक्षयकडे नेहमी जाणे-येणे सुरु होते. अक्षयला आभा नावाची एक बहिण होती. अक्षयकडे उठबस सुरु असतांना करण व आभा यांची नजरानजर सुरु झाली होती. नजरेच्या खेळात करण व आभा यांचा सहवास घडून आला. या सहवासातून दोघांचे प्रेम देखील आकार घेऊ लागले. अक्षयसोबत मैत्री केल्यामुळे करणला रेतीचे ठेके मिळू लागले. सोबतच त्याच्या बहिणीसोबत त्याचे प्रेमप्रकरण देखील बहरले. आपल्या बहिणीचे करणसोबत प्रेमप्रकरण सुरु असल्याचा सुगावा अक्षयला लागण्यास वेळ लागला नाही. त्याचा या प्रेमसंबंधाला विरोध होता. मात्र करण व अक्षयची बहिण आभा हे दोघे एकमेकांच्या प्रेमात दिवाने झाले होते. ते दोघे एकमेकांशिवाय राहू शकत नव्हते. त्यामुळे अक्षयचा विरोध पत्करुन करण व आभा या दोघांनी प्रेमविवाह केला. त्यामुळे अक्षय व करण यांच्यात शालक-मेहुणा असे नाते निर्माण झाले होते. मात्र जेव्हापासून करण याने आभासोबत विवाह केला तेव्हापासून अक्षय व करण यांच्यात दुरावा निर्माण होण्यास सुरुवात झाली होती. मात्र असे असले तरी देखील अक्षय विविध गुन्ह्यात अटक झाल्यानंतर त्याच्या जामिनासाठी करणने वेळोवेळी प्रयत्न केले. काही दिवसांपूर्वी पुणे येथून मोक्काच्या गुन्ह्यात अक्षय राठोड यास यवतमाळ पोलिसांनी अटक केली होती. त्याची औरंगाबाद कारागृहात रवानगी करण्यात आली. आता रेतीचे साम्राज्य एकटा करण परोपटे हा हडप करेल, असा संशय अक्षय राठोड यास येऊ लागला. त्याच्या काही मित्रांनी देखील हा संशय अक्षयला कारागृहात भेटून बोलून दाखवला. यात बगिरा व त्याचे काही साथीदार यशस्वी झाले. त्यांनी औरंगाबाद कारागृहात जाऊन अक्षयची भेट घेतली. कारागृहातच करणचा काटा काढण्याचा बेत आखण्यात आला. अखेर ती रात्र जवळ आली. त्या काळरात्री करण परोपटे या तरुणाची हत्या झाली. बुधवारी दुपारपासूनच अक्षयचे साथीदार करण परोपटे याच्या मागावर होते.

आपली हत्या होणार असल्याची कुणकुण करण यास लागली होती. तशी शंका त्याने पत्नी आभा हिस बोलून देखील दाखवली होती. २३ जूनच्या मध्यरात्री करण परोपटे हा रोशन गोळे व आणखी एका साथीदारासह स्टेट बँक चौकात आला असल्याचे समजताच त्याच्या मागावर असलेल्या टोळक्याने गोळ्या झाडून त्याची हत्या केली. गुन्हेगारी जगतात कुणी कुणाचा नसतो, याचा प्रत्यय या घटनेच्या निमीत्ताने आला. औरंगाबाद कारागृहातून अक्षयने त्याच्या साथीदारांसह करणच्या हत्येचा कट रचला होता. तो कट साथीदारांच्या मदतीने यशस्वी झाला होता. नागपूर, बाभूळगाव, यवतमाळ येथील साथीदारांच्या मदतीने करणचा गोळ्या घालून निर्घृण खून केल्याची फिर्याद अक्षयची बहीण व करणची पत्नी आभा परोपटे हिने पोलिसात दिली. तिच्या फिर्यादीनुसार अक्षय आत्माराम राठोड, आशीष ऊर्फ बगिरा दांडेकर (३०), शुभम बघेल (२५), धिरज ऊर्फ बँड मैंद, गौरव गजबे, प्रवीण ऊर्फ पी. के. केराम (सर्व रा. यवतमाळ), दिनेश तुरकाने (रा. बाभूळगाव), कल्या ऊर्फ नीतेश मडावी, दिलीप ठक्कर, अर्जुन भांजा (सर्व रा. दिघोरी नाका, नागपूर) या सर्वाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. यवतमाळ शहरासह जिल्ह्यात गुन्हेगारांच्या प्रतिमा जाणीवपूर्वक आयकॉनप्रमाणे समाजापुढे आणल्या जातात. याला अल्पवयीन मुले बळी पडतात. बाभूळगाव तालुक्यातील राणी अमरावती या छोट्याशा गावातील करण रणजित परोपटे हा देखील बळी पडला. तो कुख्यात रेती सम्राट अक्षय राठोड याच्या संपर्कात आला. गुन्हेगारीचा कमी अधिक प्रभाव त्याच्यावर देखील पडला होता. करणने स्वत:हून कुठलाही गुन्हा केला नसला तरी दहशतीच्या साम्राज्याची त्याला चटक लागली होती. त्यामुळे तो गुन्हेगारीच्या दलदलीत फसत गेला. अखेर ज्यांच्या साथीने त्याने रेतीच्या व्यवसायासह गुन्हेगारीच्या क्षेत्रात पदार्पण केले, त्यांनीच त्याचा घात केला. गुन्हेगाराचा शेवट हा अतिशय निदर्यी असतो हे देखील या घटनेतून सिद्ध झाले आहे. याप्रकरणी २६ जून रोजी यवतमाळ शहर डीबी पथकाने यातील प्रमुख दोघांसह चौघांना ताब्यात घेतले. आशिष उर्फ बगिरा दांडेकर (३०) रा. चमेडीया नगर, शुभम बघेल (२५) रा. वैभव नगर, प्रवीण उर्फ पिके केराम (२८) रा. पिंपळगाव आणि रघु रोकडे (२५) रा. संदीप टॉकीज, यवतमाळ या चौघांना ताब्यात घेण्यात आले. यापूर्वी पोलिसांनी देशी कट्ट्यासह दिनेश तुरकाने (२५) रा. बाभुळगाव, आणि धीरज उर्फ बँड मैंद (२५) रा. संदीप टॉकीज परिसर यवतमाळ या दोघांना अटक केली होती.वृत्त लिखान सुरु असेपर्यत या हत्या प्रकरणातील आणखी पाच संशयीत फरार होते. या टोळीत अंतर्गत धुसफूस सुरु असल्याचा सुगावा पोलिसांना लागला होता. खुनाच्या घटनेनंतर एलसीबी पथकाने गुरुवारी पहाटे धीरज उर्फ बेंड आणि दिनेश तुरकाने या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून देशी कट्टा देखील हस्तगत करण्यात आला.

### दारुड्या ट्रक चालकाच्या संसाराची होळी...

स्टेशन अंतर्गत हा प्रकार घडला आहे. भामोद येथे एका इसमाने पत्नी व १६ वर्षाच्या मुलीची हत्या करून स्वतः गळफास घेतल्याचा धक्कादायक प्रकार शुक्रवारी उघडकीस आला आहे. या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली. भामोद येथील रहिवासी अनिल देशमुख वय (४५) याने आपली पत्नी व मुलीची हत्या करून स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केली. मागील अनेक दिवसांपासून अनिल देशमुख यांचे कौटुंबिक वाद सुरू होते. शुक्रवारी दुपारच्या सुमारास परिसरातील नागरिकांना प्रचंड दुर्गधी येत होती. यावरून काहीतरी गंभीर घटना घडल्याचा अंदाज नागरिकांनी आला आणि त्यांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी अनिल देशमुख यांच्या घरी पाहणी केली असता पलंगाखाली १६ वर्षीय मुलगी साक्षी अनिल देशमुख हिचा मृतदेह आढळून आला. घटनेचा पंचनामा करत असताना पोलिसांना घरातील एका कपाटाजवळ मोठ्या प्रमाणात माशा लागलेल्या दिसल्या. त्यानंतर अधिक जवळ गेले असता मोठ्या प्रमाणात दुर्गंध आल्याने पोलिसांचा संशय बळावला. कपाट उघडले असता त्यातून देशमुख यांची पत्नी वंदना देशमुख (४०) यांचा मृतदेह आढळून आला. याच वेळी घरातील मागच्या एका खोलीत अनिल देशमुख यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

# भिवंडीत पोलीस पकडण्यासाठी आलेल्या आरोपीचा चौथ्या मजला वरून पडून मृत्यू

## पोलिसांनीच ढकलून दिल्याचा कुटुंबीयांचा आरोप, पोलिसांना धक्काबुक्की





**भिवंडी/अभिजित हिरे**

शहरातील कसाई वाडा या ठिकाणी आरोपीस पकडण्यासाठी आलेल्या वापी गुजरात येथुन आलेल्या पोलिसांना सोबत झटापटीत चौथ्या मजल्या वरून पडून एकाचा दुर्दैवी मृत्यू होण्याची घटना भिवंडीत घडली आहे. जमिल कुरेशी उर्फ जमील टकला वय ३८ असे मयत आरोपीचे नाव असून, या घटने नंतर परिसरात मोठा जमाव जमून तणाव निर्माण होऊन पकडण्यासाठी आलेल्या पोलिसां सोबत नागरिकांनी झटपट करीत धक्काबुक्की झाली त्यानंतर अधिक पोलीस कुमक मागवून जमावास शांत करून पांगविण्यात आले आहे.

भिवंडी कसाई वाडा येथे राहणार जमील कुरेशी हा गोवंश चोरीच्या गुन्ह्यातील सराईत गुन्हेगार असून त्या विरोधात वापी गुजरात येथे दाखल असलेल्या गुन्ह्यात अटक करण्या साठी गुजरात पोलिसांचे पथक भिवंडी येथे आले असता स्थानिक गुन्हे शाखेच्या पथक सोबत कसाई वाडा येथे आरोपीस पकडण्यास गेले असता आरोपी आपल्या चौथ्या मजल्या वरील घरात लपून बसला असता पोलिसांनी त्यास ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्यात झटपट होऊन खिडकीतून त्याचा तोल जाऊन तो चौथ्या मजल्या वरून थेट जमिनीवर आदळला ज्यामध्ये त्याचा जागेवरच मृत्यू झाला. या घटने नंतर परिसरातील मोठा जमाव घटनास्थळी जमा होऊन त्यांनी गुजरात व गुन्हे शाखेच्या पोलिसांना अडवून त्यांनी जमील कुरेशी यास खिडकीतून ढकलून दिले असा आरोप करीत गदारोळ घालीत पोलिसां सोबत धक्काबुक्की झाली. तर आज शुक्रवारच्या नमाज नंतर जमील कुरेशी हा घरात जेवत असताना गुजरात पोलीस थेट त्याच्या घरात घुसून त्यास ढकलून दिल्याने त्याचा मृत्यू झाल्याची आरोप मयत जमील कुरेशी ची वहिनी अनिसा कुरेशी यांनी केला आहे. या घडामोडी नंतर स्थानिक निजमपुरा पोलिसांना घटनेची माहिती मिळताच अधिक पोलीस कुमक घेऊन घटनास्थळी जमा झालेले जमाव शांत करीत पंगविला व त्यानंतर मृतदेह शवविच्छेदना साठी आयजीएम रुग्णालयात दाखल केला. या नंतर दोन्ही ठिकाणी मोठी पोलीस कुमक तैनात करण्यात आली होती. पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण व सर्व पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी रुग्णालयात दाखल होत तेथे ही जमा झालेले जमाव पांगविण्यात आला असून, गुजरात पोलिसांनी परस्पर गुन्हे शाखेच्या पोलिसां सोबत सदरची कारवाई स्थानिक निजमपुरा पोलिसांना न कळविताच करण्याचे धाडस केले व त्यानंतर पोलीस कारवाई बाबत अनेक उलट सुलट चर्चा सुरू झाल्या आहेत. दरम्यान या बाबत योग्य ती माहिती घेऊन जे दोषी असतील त्यांच्या विरोधात योग्य ती कारवाई करण्यात येईल अशी प्रतिक्रिया पोलीस उपायुक्त योगेश चव्हाण यांनी देत सध्या परिसरात शांतता प्रस्थापित करण्यात आल्याचे सांगितले.

# देवणी तालुक्यात पावसाची दमदार हजेरी हिसामनगर-हेळंब मार्गावरील पुल खचला



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील वलांडी, बोरोळ, देवणी या तिन्ही मंडळात रविवार दि.२७ जून रोजी दुपारी दोन तास पावसाने दमदार हजेरी लावली असून तालुक्यातील हिसामनगर ते हेळंब जाणाऱ्या पुलावर भगदाड पडून पुल खचल्याने रहदारीला धोका निर्माण झाला आहे. देवणी तालुक्यात पावसाच्या प्रतिक्षेत असलेला बळीराजा पावसाने काही प्रमाणात का होईना सुखावला आहे. झालेल्या पावसाने हिसामनगर ते हेळंब मार्गावरील पुला खालून दुथडी वाहणाऱ्या पाण्याने पुलावरील रस्त्यावर भगदाड पडून पुल खचला आहे. परिणामी या मार्गावरून जाणाऱ्या रहदारीला धोका निर्माण झाला आहे. सदरील पुलाचे व रस्त्याचे काम होऊन एक वर्षे लोटले असताना पुलाला भगदाड पडले असल्याचे स्थानिक नागरिक व शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. तर कवठाळ येथे ठेकेदाराने रस्त्यावरील पाणी जाण्यासाठी मार्ग मोकळा केला नसल्याने रस्त्यावर पावसाच्या पाण्याने ओढ्याचे स्वरूप प्राप्त झाले होते. देवणी तालुक्यात दोन आठवड्याच्या विश्रांतीनंतर रविवारी दुपारी पावसाने दमदार हजेरी लावल्याने बळीराजाच्या आशा पुन्हा एकदा पल्लवीत झाल्या आहेत. निसर्गावर विश्वास ठेवून तालुक्यातील शेतकऱ्यांनी काही भागात पेरण्या केल्या होत्या. उगवलेल्या कोवळ्या पिकांना हा पाऊस तारणहार ठरला आहे. तर पावसा अभावी ज्या शेतकऱ्यांच्या पेरण्या थांबल्या होत्या आता पेरणीचे काम विनाविलंब पुर्णत्वास जाणार आहेत.

# अंत्योदय अन्न योजनेतील शिधापत्रिकाधारकांना प्रति शिधापत्रिका एक किलो साखर उपलब्ध

**पालघर/प्रतिनिधी**

सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी एन.सी.डी.इ.एक्स स्पॉट एक्सचेंज लिमिटेड मार्फत अत्यंत आधुनिक व पारदर्शक पद्धतीने लाईव्ह ऑक्शनच्या माध्यमातून त्यांचेकडील नोंदणीकृत M/s ETC gro Processing (India) Pvt Ltd Mumbai यांच्याकडून पालघर जिल्ह्यातील अंत्योदय लाभार्थ्यासाठी माहे जूलै २०२१ ते सप्टेंबर, २०२१ या तिमाहीसाठी ३०६९ क्विंटल S-30 दर्जाची साखर प्राप्त होणार आहे. पालघर जिल्ह्यातील तालुकानिहाय गोदामांपर्यंत साखर पोहोचविणेसाठी संबंधितास कळविलेले आहे. सदर साखर सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अंत्योदय अन्न योजनेतील शिधापत्रिकाधारकांना प्रति शिधापत्रिका १ किलो प्रमाणे २० रुपये प्रति किलो या दराने १००% उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.





आगार व्यवस्थापक भोसले साहेब, सेवानिवृत्त कांबळे साहेब, माजी आगार व्यवस्थापक तसेच नालासोपारा आगारातील कर्मचारी शेख, के.जी. जोशी व वाहतूक निरीक्षक पारधी साहेब. तसेच वसई आगारातील सहकर्मचारी भट साहेब, सौ. डाबरे मॅडम, लेखाकार सौ. ठोंबरे मॅडम तसेच मुकेश साखरे, प्रविण तायडे, वानखेडे, बोकडे, थोरात, वाहतूक नियंत्रक व वर्कशॉपमधील ठाकुर व इतर सहकर्मचारी यांच्या उपस्थितीत सेवानिवृत्तीचा कार्यक्रम पार पडला. यावेळी क्राईम संध्याचे संपादक लक्ष्मणराव पाटोळे, कार्यक्रमाचे अध्यक्ष वसई आगाराचे आगार व्यवस्थापक दिलीप भोसले साहेब होते. सुत्रसंचलन प्रवीण तायडे यांनी केले व सहकर्मचारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सेवानिवृत्त सत्कार मुर्ती गौतम कठाणे आपले मनोगत व्यक्त करून अध्यक्षीय भाषणाणे कार्यक्रमाची समाप्ती करण्यात आली.

# भिवंडी-वाडा महामार्गाची दुरवस्था; माती टाकून खड्डे भरण्याचा प्रयत्न



**वाडा/प्रतिनिधी**

भिवंडी- वाडा या रस्त्याची दरवर्षी पावसाळ्यात चाळण झाल्याचे दिसून येते. रस्ता रुंदीकरण झाल्यापासून या महामार्गावरील अपघातात शेकडो जणांचा जीव गेला आहे तर अपघातात कायमचे अपंगत्व आल्याने अनेक कुटुंबाची आर्थीक परिस्थिती ढासळली आहे. शुक्रवारी सकाळच्या सुमारास रस्त्यावरील खड्डयाचा अंदाज न आल्याने एक कार खड्ड्यात अडकून पडली, सुदैवाने जीवितहानी झाली नाही मात्र आर्थिक नुकसान झाले आहे. या अगोदर सिमेंटचे मोठे पाईप घेऊन जाणाऱ्या ट्रकचा खड्ड्यांमुळे अपघात होऊन ट्रक मधील पाईप रस्त्यावर पडून अपघात झाला होता सुदैवाने यात जीवितहानी झाली नाही. कुडूस गावाच्या हद्दीत या महामार्गावर मोठ मोठे व दिड ते दोन फूट खोल असे अनेक खड्डे पडल्याने या खड्ड्यांमुळे दररोज अपघात होत आहेत. तर मागच्या शुक्रवारी देखील एक तरुणी आपली स्कुटी घेऊन खड्ड्यात पडली होती, सुदैवाने मागून येणाऱ्या ट्रक चालकाने वेळीच ट्रक रोखला नाही तर अनर्थ घडला असता. दोन दिवसांपूर्वी सदरचे खड्डे भरण्यासाठी मुरूमाच्या मातीचा वापर करुन वरवरची मलमपट्टी करण्याचा प्रयत्न करून सर्वसामान्यांच्या जीवाशी खेळण्याचाच एक प्रकार असल्याचे बोलत नागरिकांमधून संतप्त भावना व्यक्त होत आहेत. या बाबत विचारणा करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रभारी उप-अभियंता अनिल बरसट यांच्याशी संपर्क केला असता तो होऊ शकला नाही.

# शेतकरी आणि सामाजिक संघटनांच्या शिष्टमंडळाने घेतली उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मंत्रालयात भेट



**मुंबई/प्रतिनिधी**

केंद्रीय कृषी कायद्यांसंदर्भात शेतकरी बांधवांच्या भावना राज्य सरकारच्या लक्षात आणून देण्यासाठी शेतकरी व सामाजिक संघटनांच्या शिष्टमंडळाने मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेऊन चर्चा केली व मागण्यांचे निवेदन दिले. राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करते आणि हे सरकार कायम शेतकऱ्यांच्या बाजूनेच उभे राहील.

शेतकरी हिताचे पाऊल उचलण्यात सरकार मागे हटणार नाही, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चर्चेवेळी शिष्टमंडळाच्या नेत्यांना दिला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मंत्रालयातील दालनात झालेल्या भेटीच्या वेळी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, सहकारमंत्री बाळासाहेब पाटील, कृषीमंत्री दादाजी भुसे आदींसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शिष्टमंडळात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख माजी खासदार राजू शेट्टी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या मेधाताई पाटकर, प्रतिभा शिंदे, एस. व्ही. जाधव, अशोक ढवळे, नामदेव गावडे, सुभाष लोमटे, किशोर ढमाले, सीमा कुलकर्णी, सुभाष काकस्ते, उमेश देशमुख, शकील अस्मेद आदी मान्यवरांचा समावेश होता.

# तळेगाव ग्रामपंचायतच्या वतीने माजी मंत्री विनायकराव पाटील यांचा सत्कार



**अहमदपूर/प्रतिनिधी**

तालुक्यातील तळेगाव ग्रामपंचायतच्या वतीने माजी मंत्री विनायकराव पाटील यांची भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल नुकताच सत्कार करण्यात आला. सर्वप्रथम तळेगाव येथील प्रसिद्ध असलेल्या हनुमान पुजा माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आली त्यानंतर ग्रामपंचायत व सहकारी सोसायटी व ग्रामस्थांच्या वतीने माजी मंत्री विनायकराव पाटील यांचा भव्य सत्कार सोहळा संपन्न झाला. यावेळी राजकुमार खंदाडे, माधवराव शेळके, प्रतापराव शेळके, अँड.राजेंन्द्र शेळके, चेअरमन विश्वाभंर पवार, सरपंच सारीका गणाचार्य, शिवराज शेळके, विशाल शेळके, अजिंक्य शेळके आदिसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केवणीदिवेतील विकासकामांचे कपिल पाटील यांच्याकडून लोकार्पण

**भिवंडी/आकाश गायकवाड**

तालुक्यातील केवणीदिवेतील विकासकामांचे खासदार कपिल पाटील यांच्या हस्ते आज लोकार्पण करण्यात आले. केवणीदिवेतील जनतेला नागरी सुविधा देण्यासाठी भाजपा कटीबद्ध असल्याचे खासदार कपिल पाटील यांनी नमूद केले.



माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने खासदार कपिल पाटील यांच्या प्रयत्नाने केवणीदिवे ते कोपर मुख्य रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणासाठी ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. या रस्त्याच्या कामाबरोबरच केवणीदिवे ते कोपर रस्त्याच्या उर्वरित भागाचे ८० लाख खर्चून केलेले काम, जिल्हा परिषदेच्या केवणी दिवे शाळेत पत्राशेड व शाळेभोवती संरक्षण भिंत, ५० लाख खर्चून अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रिटीकरण, दिवे गावातील अंतर्गत तलावापासून स्मशानभूमीपर्यंतचा ५० लाखांचा रस्ता आदी कामांचे आज लोकार्पण करण्यात आले. या वेळी माजी सभापती सपना राजेंद्र भोईर, जिल्हा परिषदेचे सदस्य जयवंत पाटील, भाजपाचे तालुकाध्यक्ष पी. के. म्हात्रे, पंचायत समिती सदस्या उज्वला राम भोईर, ललिता प्रताप पाटील, कोपरचे सरपंच रमेश पाटील, दिवेचे सरपंच रवींद्र भोईर, उपसरपंच सुमन पाटील, केवणीच्या सरपंच किर्ती पाटील, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष छत्रपती पाटील, राजेंद्र भोईर आदींची उपस्थिती होती. केवणीदिवे गावाच्या लोकसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्याचबरोबर नागरी सुविधा पुरविण्याचे आव्हानही आहे. मात्र, सर्व सुविधा पुरविण्यासाठी भाजपा कटीबद्ध आहे. त्यातूनच तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमएमआरडीएच्या माध्यमातून भिवंडी तालुक्यातील गावांमध्ये कॉंक्रिट रस्त्यासाठी निधी मंजूर केला होता. त्यातूनच केवणीदिवेतील रस्त्याचे काम सुरू होत आहे, असे खासदार कपिल पाटील यांनी सांगितले.

दरम्यान मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी संपादित करण्यात आलेल्या केवणीदिवे गावातील जमिनीला कमी मोबदला दिला जात होता. याबद्दल खासदार कपिल पाटील यांनी आवाज उठविल्यानंतर मोबदल्याच्या रक्कमेत वाढ झाली. त्याबद्दल केवणी ग्रामपंचायतीतर्फे खासदार कपिल पाटील यांचे आभार मानण्यात आले.

## थोडक्यात वृत्तांत

### आज ऑनलाईन जिल्हास्तरीय लोकशाही दिन

पालघर : मा.सह सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२३/११/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये कोविड-१९ च्या परिस्थितीमध्ये लोकशाही दिनाचे आयोजन परिस्थितीनुरुप करण्यासाठी जिल्हाधिकारी सक्षम असल्याबाबत सुचित केलेले आहे. त्याअनुषंगाने माहे जूलैचा जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार, दि. ०५/०७/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता मा. जिल्हाधिकारी महोदय यांचे अध्यक्षतेखाली त्रेसश्रश चशशीं व्दारे आयोजित करण्यात येणार आहे. तरी https://meet.google.com/usd-iydr-rku hr Google Meet ची लिंक असून सदर लिंक चा वापर करून लोकशाही दिनास आवश्यक त्या माहितीसह उक्त दिनांकास व वेळेवर उपस्थित रहावे.

### गंगाराम लक्ष्मण सोनकांबळे यांचे निधन



देवणी : गुरधाळ येथील माजी जिल्हा परिषद सदस्य तथा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच कै गंगाराम लक्ष्मण सोनकांबळे वय ७० वर्ष यांचे दीर्घ आजाराने १/७/२०२१ रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर गुरधाळ येथील शेतात सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन सुना नातू, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ते रवि गुरधाळकर याचे वडिल होते तसेच राष्ट्रीय समाज पक्षाचे उदगीर शहर सचिव उध्दव गायकवाड यांचे चुलते होते, त्यांच्या जानाने गुरधाळ गावात हळहळ व्यक्त होत आहे.

### मृत्यू झालेल्या कुटूंबातील व्यक्तीने अर्ज करावे

पालघर : राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त आणि विकास महामंडळ, नवी दिल्ली (National Scheduled Castes and Development Corporation) यांच्यामार्फत अनुसूचित जातीतील चर्मकार समाजासाठी Support for Marginalized Individuals for Livelihoods and Enterprise (SMILE) ही नवीन योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. कोविड-१९ या महामारीमुळे ज्या कुटूंबातील प्रमुख व्यक्ती (ईशरवशरीपशी) मृत्यु पावली आहे अशा कुटुंबातील प्रमुख वारसदारास एन.एस.एफ.डी.सी, नवी दिल्ली यांचेमार्फत रु.५ लाखापर्यंत व्यवसायासाठी कर्ज देण्याची योजना विचाराधीन आहे. त्याचा सविस्तर तपशील १) एन.एस.एफ.डी.सी. कर्ज रूपये ४.०० लाख व्याज दर ६ टक्के २) भांडवली अनुदान रू. १.०० लाख व्याज दर ६ टक्के असा आहे. मयत व्यक्तीची आवश्यक माहिती : १) मयत व्यक्तीचे नांव, संपूर्ण पत्ता, आधार क्रमांक, जन्मतारीख, लिंग, जात, पोटजात, मृत्यूची दिनांक, रेशनकार्ड, मयत झालेल्या व्यक्तीचा मृत्यूचा दाखला. २) कुटूंबातील व्यक्तींची एकुण संख्या कुटूंबातील प्रमुख वारसदार, कुटूंबातील व्यक्तींचे वार्षिक उत्पन्न (रु. ३.०० लाखाच्या आत). कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मृत्यु झालेल्या कुटूंबातील व्यक्तीने उपरोक्त वरील माहिती महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात सादर करावी अथवा महामंडळाच्या ई-मेलवर पाठविण्यात यावी. सोबत लिंक https://forms.gle/Q485fSUQYEuL4xUx7 असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, पालघर संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित यांनी कळविले आहे.

### एस.सी.समाजातील कुटुंब सदस्यांनी अर्ज करावा

लातूर : एनएसएफडीसी नवी दिल्ली यांच्या माध्यमातून महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ यांच्यामार्फत कोविड-१९ या जागतिक महामारीत अनुसूचित जातीच्या कुटुंबप्रमुखाचा मृत्यू झाला आहे. त्या कुटुंबियाचे पुनर्वसन करण्यासाठी and Support for Marginalized Individuals for Livelihoods Enterprie (SMILE) ही व्यवसायासाठी कर्ज देण्याची योजना विचारधीन आहे.सदर योजनेची माहिती आणि अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहे. तपशील प्रकल्प मूल्य-रुपये १ लाख ते ५ लाखापर्यंत, एनएसएफडीसी सहभाग ८० टक्के, भांडवल अनुदान २० टक्के, व्याजदर ६ टक्के व परतफेडीचा कालावधी ६ वर्ष. पात्रता- अर्जदार अनुसूचित जातीतील असावा, अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रुपये ३ लाखापर्यंत असावे. अर्जदार हा कोरोनामुळे मृत्यू पावलेल्या कुटुंब प्रमुखाच्या कुटुंबातील सदस्य असावा. (कुटुंब प्रमुखाच्या रेशनकार्डवर सदर सदस्याचे नाव असणे बंधनकारक) मृत्यू पावलेल्या व्यक्तीची वयोमर्यादा १८ ते ६० च्या दरम्यान असावी. मृत्यू पावलेल्या कुटुंब प्रमुखाची मिळकत कुटुंबाच्या एकूण मिळकतीपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. कोरोनामुळे मृत्यू पावलेल्या व्यक्तींकरिता पुढील पैकी एक दस्तावेज आवश्यक आहेत. महारनगरपालिका नगरपालिका यांनी दिलेले मृत्यू प्रमाणपत्र. स्मशानभूमी प्राधिकरणाने दिलेली पावती. एखादया गावात स्मशानभूमी नसल्यास गट विकास अधिकाऱ्याने दिलेले मृत्यू प्रमाणपत्र. आवश्यक कागदपत्रे- मयत व्यक्तीचे नाव पत्ता, आधारकार्ड, उत्पन्नाचा दाखला (३ लाखा पर्यंत), कोविड-१९ मुळे मरण पावलेल्या व्यक्तीचा मृत्युचा दाखला, रेशन कार्ड व वयाचा पुरावा. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे १५ जून २०२१ पर्यंत मृत्यु झालेल्या अनुसूचित जातीतील (SC) कुटुंबातील व्यक्तीने उपरोक्त वरील माहिती महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात थवा या लिंकवर https://forms.gle/7mG8CMecLknWGt6K7 दिनांक ३० जून २०२१ पर्यंत भरण्यात यावा.असे जिल्हा व्यवस्थापक महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्या.) लातूर यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### नागरिकांनी कोव्हिड नियमांचे पालन करावे!

पालघर : मा. मुख्य सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश दिनांक ०४/०६/२०२१ नुसार संपूर्ण जिल्ह्याचा कोविड Positivity दर ५ टक्के पेक्षा कमी असल्यास डर्शींशश्र १ व डर्शींशश्र २ मध्ये व Positivity दर ५ ते १० टक्के असल्यास Level 3 मध्ये समावेश होतो. दि. २५/०६/२०२१ नुसार RTPCR Positivity दराप्रमाणे पालघर जिल्ह्यामध्ये डर्शींशश्र ३ निश्चित करण्यात आली आहे. मात्र दि. २६/०६/२०२१ रोजी १३.८% व दिनांक २७/०६/२०२१ रोजी १२.९% एवढा Positivity दर वाढला आहे. पालघर जिल्ह्यात पालघर ग्रामीण ७५०, वसई विरार शहर महानगर पालिका १२३२ एवढया केसेस आहेत. नागरिकांनी कोविड नियमांप्रमाणे वर्तणूक करणे आवश्यक आहे. लक्षणे असलेल्या नागरिकांनी त्वरीत कोविड चाचणी करावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

# डरपोकांनी करावे आणि गरिबांनी भरावे!

माणूस म्हटला की त्याला जगण्यासाठी संघर्ष हा करावाच लागतो. कारण कधी कुठले संकट येईल त्याचा नेम नाही. अशावेळी संकटाच्या भीतीने घरात लपून बसण्यापेक्षा त्या संकटाचा मुकाबला करायला हवा. आणि ज्यांनी ज्यांनी संकटांचा मुकाबला केला ते यशस्वी झाले. इतिहासात त्यांचे नाव अजरामर झाले. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले छत्रपती शिवाजी महाराज हे त्यापैकीच एक होते! महाराजांनी मोठमोठ्या संकटांचा मुकाबला करीत यशाची एकएक पायरी गाठली आणि हिंदवी स्वराज्याचे तोरण बांधले. पण आज मात्र महाराष्ट्र पूर्णपणे बदलला आहे. कारण आज जे सतेत बसले आहेत त्यांना इतरांपेक्षा स्वतःच्या जीवाची आणि खुर्चीची अधिक काळजी आहे. पण आव मात्र असा आणीत आहेत की जणू राज्यातील साडेबारा कोटी जनतेच्या हितासाठीच त्यांचा जन्म झालाय. पण कोरोनाच्या संकटकाळात त्यांचे पितळ उघडे पडले आहे. कोरोनाची भीती दाखवून लोकांना घराची दारे खिडक्या बंद करायला लावणारे आणि जनतेला घरात कोंडून मारण्यास भाग पाडणाऱ्या या लोकांना एक गोष्ट कळायला हवी होती की आपल्या देशावर आणि महाराष्ट्र राज्यावर कोरोना पेक्षाही भयंकर संकट येत आहे आणि हे संकट स्वतःच सरकारने ओढवून घेतले आहे. या महाभयंकर संकटाचे नाव आहे महागाई आणि १ जुलै पासून त्याची चाहूल लागायला सुरूवात झाली आहे. गरिबाच्या घरातील मीठ भाकरी पासून श्रीमंतांच्या कारपर्यंत सर्व काही महाग होऊ लागले आहे.

कोरोनाच्या काळात लादलेल्या लॉकडाऊनमुळे एकीकडे लोकांचा रोजगार बुडाला. त्यामुळे पैसा हाती येईना. कुटुंबावर उपासमारीची पाळी आलीय आणि या संकटाशी झुंजणाऱ्या गोरगरीब माणसावर आता महागाईशी सामना करण्याची पाळी आलीय. त्यामुळे आता जगायचे कसे असा यक्ष प्रश्न गरीब, मध्यमवर्गीय जनतेसमोर आहे आणि महागाईच्या या संकटाला अर्थातच कोरोनाच्या भीतीने गारठलेले सरकार जबाबदार आहे हे वेगळे सांगायची गरज नाही. महाराष्ट्र सरकारवर जवळपास पाच लाख कोटींचे कर्ज आहे. असे असताना कोरोनाच्या भीतीने राज्यातील उद्योगधंदे बंद ठेवून महसुली उत्पन्न बुडवणे हा शुद्ध मूर्खपणा होता! आणि गेल्या १४ महिन्यांपासून सरकारने कधी लॉकडाऊन तर कधी कठोर निर्बंध लादून उद्योग धंदे बंद ठेवले. कोरोना संपूर्ण जगात पसरलेला आहे म्हणून काय लोकांनी काम धंदा सोडून दिलेला नाही की खाणेपिणे बंद केलेले नाही. कोरोनाच्या संकटाशी मुकाबला करीत लोक काम धंदा करीत आहेत. कारण उद्योग धंदे चालले तर देशातील सरकारला महसूल मिळेल आणि सरकारे चालवण्यासाठी जो महसूल लागतो तो अर्थातच उद्योग धांद्यातून आणि लोकांच्या मेहनतीतून मिळत असतो. पण सरकारनेच उद्योगधंद्यांना टाळे लावल्याने सरकारकडे पैसा येणार कुठून आणि पैसा नसेल तर सरकार चालवायचे कसे? मग घाला जनतेच्या खिशात हात करा हवी तशी करवाड जेणेकरून नोकरी धंदा गेलेला माणूस लवकरात लवकर आपल्या मुलाबाळांसह आत्महत्या करून मारावा हाच या मागचा उद्देश. असावा म्हणजे कोरोनाच्या भीतीने उद्योग धंद्यांना टाळे लावायचे पाप यांनी करायचे आणि नंतर जनतेवर महागाई लादून त्या पापाची शिक्षा जनतेला भोगायला लावायची हे आहे डरपोक सरकारचे नवे धोरण! त्यामुळे आता कोरोनाच्या प्रकोपातून जे जगले वाचलेत त्यांनी आता महागाईच्या भस्मासुराचा मुकाबला करण्याची तयारी ठेवावी. कारण काल १ जुलैचा मुहूर्त साधून महात्मा मोदी यांनी घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात वाढ केली आहे. पेट्रोल-डिझेलचे दर तर दिवसागणिक आकाशाला भिडले. पालेभाज्या खाण्याचे दिवस आता संपलेत. इतक्या पालेभाज्या महागल्या आहेत. अन्न धान्य सुद्धा महागले आहे. उद्धव ठाकरे यांनी तीन किलो गहू आणि दोन किलो तांदूळ तर मोफत दिले, पण ते चावून खाण्यासाठी नकली दात मात्र मोफत द्यायला विसरलेत. अधिवेशनात विरोधकांनी याची त्यांना जाणीव करून द्यावी काय लोक आहेत? अजूनही त्यांना याचे काही वाटत नाही. त्यांना जळी स्थळी काष्ठी कोरोना दिसतोय आणि कोरोना जणू काही लोकांची वाट बघत रस्त्यावरून फिरतोय आणि प्रत्येकाला पकडतो आहे अशीच भीती या लोकांनी पसरलीय. तिसरी आणि चौथी लाट हे कल्पना चित्र रंगवून लोकांच्या मनात कोरोनाची दहशत निर्माण केली जातेय. पण लोक मात्र या दरपोकांच्या अफवांना घाबरलेले नाहीत ते घराबाहेर पडत आहेत. रेल्वेचे नकली ओळखपत्र बनवून लोकल मधून प्रवास करून कामाधंद्याला जात आहेत. कारण या डरपोक लोकांच्या नादाला लागून घरी बसलो तर खाणार काय? आणि खरे आहे लोकांचे कारण लोकांची आता सहनशीलता संपलीय म्हणूनच आता लोक कोरोनाची भीती बाळगायला तयार नाहीत. व्यापाऱ्यांनी सुद्धा आता सरकारच्या विरोधात रणशिंग फुंकले आहे. त्यांनी सरकारचे कठोर निर्बंध झुगारून दुकाने उघडण्याचा निर्णय घेतला आहे. सरकार किती लोकांवर कारवाई करणार आहेत. कारण सरकारकडे जितके पोलीस आहेत त्याच्या दसपट लोकांची संख्या आहे. त्यामुळे कोणाकोणाला पकडणार? त्यामुळे कोरोना, महागाई आणि सरकार या तिघांचाही सामना करायला लोक तयार आहेत. पण तसे होण्याची वेळ येऊ नये. सरकारने आता लोकांचाही विचार करावा. मोठी माणसे एकवेळ पोटाला दोर बांधून दोन दिवस उपाशी राहू शकतील. पण लहानग्यांचे काय? त्यांनी भुकेने फोडलेला टाहो पाहून आज प्रत्येक आईबाप कासावीस होतोय, ज्या डॉक्टरांच्या तस्क फोर्सने सरकारला लॉकडाऊनचा सल्ला दिला त्यांची पोरबळ सुखात आहेत, पण ज्यांची उपाशी आहेत त्यांचा कधी विचार करणार कि त्यांनी सुद्धा भुकेने व्याकूळ होऊन मारावे.

# डरपोक बोरुबहद्दर



**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**

लेखणी ही तलवारी पेक्षाही धारदार असते फक्त ती चालवण्याची ताकद माणसाच्या मनगटा मध्ये हवी, ती जर असेल तर भल्या भल्या मुजोरांना धडा शिकवता येतो मदांध सत्ता उलथवून टाकता येतात हा आजवरचा इतिहास आहे. आणि महाराष्ट्र तर अशा शौर्यशाली इतिहासाचे प्रतीक आहे. महाराष्ट्राला शिवशाहीच्या पराक्रमाचा वारसा आहे त्याच बरोबर मराठी लेखणीला दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर, टिळक, आगरकर, अत्रे, खाडिलकर यासारख्या दिग्गजांनी केलेल्या समाज प्रबोधनाचा इतिहास आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक जडणघडणीत कला, साहित्य आणि पत्रकारिता यांचे फार मोठे योगदान आहे असे असताना आज मात्र महाराष्ट्रातले चित्र काहीसे वेगळे दिसत आहे. स्वतःला पत्रकार म्हणून घेणारे आजचे पत्रकार जणू काही मेलेल्या आईचे दूध प्यायला सारखे कणाहीन होऊन बसले आहेत. दुसऱ्यावर होणाऱ्या अन्यायाच्या विरुद्ध आवाज उठवणाऱ्या पत्रकाराला आज स्वतःसाठी रेल्वेचे तिकीट सुद्धा मिळवता येत नाही यासारखी शरमेची बाब नाही. सरकारच्या अन्यायसमोर पत्रकार का इतके हतबल झाले तेच कळत नाही?पत्रकारितेची स्वतःची एक ताकद होती, एक वेगळी ओळख होती पण आज ती पुसली गेलीय कारण पत्रकारांनी हातात बांगड्या भरल्या आहेत म्हणून तर सरकारच्या विरोधात ते आवाज उठवायला तयार नाहीत. आज लॉक डाऊनच्या नावाखाली सरकारने पत्रकारांना लोकल ट्रेनच्या प्रवासाची सुविधा नाकारली आहे अशा स्थितीत पत्रकारांना काम करणे अवघड झाले आहे. ठाण्याला किंवा वसई विरारला राहणाऱ्या पत्रकाराला एखाद्या बातमीचे कव्हरेज घ्यायला जर मुंबईला जायचे असेल किंवा मुंबईतील एखाद्या आंदोलनात भाग घ्यायचा असेल तर तो तिथपर्यत पोहचू शकत नाही कारण एसटीचा प्रवास वेळेच्या दृष्टीने परवडत नाही. विरार वरून एसटी बसने मुंबईला यायचं झाल्यास साडेतीन तास लागतात अशावेळी विरार मध्ये राहणारा पत्रकार मुंबईला वेळेवर कसा पोहचू शकतो. पत्रकारांची ही अडचण सरकारला दिसत नाही का? आणि मुंबई व आसपासच्या परिसरात राहणाऱ्या पत्रकारांची संख्या काही कोरोडोच्या घरात नाही की त्यांनी लोकल ट्रेन मधून प्रवास केल्यास त्यांच्यामुळे कोरोना पसरु शकतो. मुंबई आणि आसपासच्या परिसरात जेमतेम पाच दहा हजार पत्रकार असतील मग एवढ्या कमी संख्येने असलेल्या पत्रकारांनी लोकल मधून प्रवास केल्यास त्यांच्या मुळे कोरोना पसरणार आहे का? पत्रकारांना लोकल प्रवास नाकारणे म्हणजे जनता आणि सरकार यांच्यातला दुवा तोडून टाकण्यासारखे आहे आणि महाराष्ट्र सरकारने तेच केले असून हा सरळ सरळ लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर आघात आहे अशावेळी पत्रकारांनी सरकारच्या विरोधात मोहीम उघडायची सोडून ते हातात बांगड्या भरून बसलेत. आता घागरा चोळी नेसून मंत्रालयासमोर टाळ्या पिटत बसा म्हणजे अधिवेशनाला येणाऱ्या आमदारांचे दोन दिवस का होईना चांगले मनोरंजन होईल. आज पत्रकारितेचा कुणालाही वचक राहिलेला नाही कारण लोकांना माहीत पडलेय की चिरीमिरी घेऊन बातम्या छापणारे पत्रकार विकाऊ आहेत त्यामुळे अशा लोकांना का घाबरायचे. संपूर्ण महाराष्ट्र आतापर्यंत कोरोनाच्या भीतीने गारठलेल्या उद्धव ठाकरे यांनाच डरपोक समजत होता पण आज समजले की त्यांच्यापेक्षाही डरपोक इथले पत्रकार आहेत म्हणूनच पत्रकारांवर अन्याय करण्याचे सरकारला धाडस होतेय अन्यथा एव्हाना जर पत्रकारांनी सरकारच्या विरोधात आपली लेखणी चालवली असती आणि रस्त्यावर उतरले असते तर पत्रकारांना लोकल ट्रेनचा प्रवास नाकारण्याची सरकारची हिम्मत झाली नसती. आज लॉक डाऊनच्या काळात पत्रकारांना खूप काही सोसावे लागतेय. छोटे पेपर बंद पडलेत तर बड्या वृत्तपत्रांमध्ये कामगार कपात सुरू आहे परिणामी अनेक पत्रकारांच्या नोकऱ्या गेल्या आहेत त्यांच्यावर उपासमारीची पाळी आली आहे. दुर्दैवाने पत्रकार हा असंघटित कामगारांच्या श्रेणीत येत असल्याने सरकारचे त्याच्याकडे लक्ष नाही त्यामुळे सरकारकडून कुठली मदत मिळत नाही. अगोदरच या व्यवसायात जॉब सिक्युरिटी नाही त्यामुळे अनेक पत्रकारांची दुर्दशा झालीय म्हणूनच त्यांनी कधीतरी संघटितपणे आपली ताकद दाखवण्याचा विचार करायला हवा पण आज ते आपल्यासाठी सरकारला लोकल ट्रेन सुरु करण्यास भाग पाडू शकत नाहीत तर त्यांच्या इतर समस्यांना काय न्याय मिळणार? पत्रकारांची ही हतबलता सरकारच्या पथ्यावर पडली आहे लॉकडाऊनच्या या सव्वा वर्षाच्या काळात पत्रकारांचा सरकारवर कुठेही प्रभाव जाणवला नाही त्यामुळे सरकारही पत्रकारांना जास्त महत्त्व द्यायला तयार नाहीत. जे पत्रकार मंत्र्या संत्र्याच्या पे-रोलवर आहेत त्यांना महिन्याची पाकिटे मिळत आहेत त्यामुळे ते पुढाऱ्यांच्या ताटा खालचे मांजर होऊन भिक्षुकाचे जीवन जगत आहेत त्यांनी आपली लेखणी पुढाऱ्यांच्या चरणी गहाण ठेवलीय त्यामुळे त्यांना लॉकडाऊनची झळ पोहचली नाही म्हणून ते सरकारच्या विरोधात बोलायला तयार नाहीत पण इतरांनी तरी आवाज उठवायला हवा होता पण तेही गप्प आहेत आणि म्हणूनच आज पत्रकारांची हालत पाहता त्यांनी स्वतःला पत्रकार म्हणवून घेणे म्हणजे पत्रकारितेचा अपमानच म्हणावा लागेल.

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# शेतकऱ्यांच्या हिताला धक्का पोहचेल असे निर्णय घेणार नाही -मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत कृषी संजीवनी मोहिमेचा समारोप

**मुंबई/प्रतिनिधी**

शेतकरी महाराष्ट्राचे वैभव असून त्यांच्या हिताला धक्का पोहोचेल असे निर्णय घेणार नाही. राज्याचे हे हरित वैभव वाढण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील असल्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज येथे सांगितले. कृषी विभागातर्फे राबविण्यात आलेल्या कृषी संजीवनी मोहिमेचा समारोप झाला. यावेळी नाशिक येथून दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री अजित पवार सहभागी झाले होते. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, कृषीमंत्री दादाजी भुसे, फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे, कृषी राज्यमंत्री डॉ.विश्वजीत कदम, फलोत्पादन राज्यमंत्री कु.आदिती तटकरे हे सह्याद्री अतिथीगृह येथे उपस्थित होते. कृषीदिनानिमित्त माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस मुख्यमंत्र्यांसह मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी कृषीदिनानिमित्त शुभेच्छा देतानाच आज राष्ट्रीय डॉक्टर दिन आहे याचा उल्लेख करत कोरोना काळात शेतकरी आणि डॉक्टर यांनी केलेल्या कामाचे कौतुक करताना हे दोन्ही अन्नदाते आणि जीवनदाते असल्याचे गौरवोद्‌गार मुख्यमंत्र्यांनी काढले.

**शेतकरी राज्याचे वैभव**

मुख्यमंत्री श्री.ठाकरे म्हणाले, शेतकरी राजा राज्याचे वैभव असून ते जपण्याचे काम राज्यशासनाच्या माध्यमातून केले जात आहे. शेती व्यवसायातील अनिश्चितता लक्षात घेऊन त्यात धाडसाने पाऊल टाकणाऱ्या बळीराजाला ताकद देण्याचे काम राज्य शासन करीत आहे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. राज्यात दुष्काळ, पूर, गारपीट, कोरोना असे संकट आले, मात्र शेतकरी डगमगला नाही. सोन्यासारखे पिक नैसर्गिक आपत्तीत उद्धवस्त होते अशा वेळी शासन म्हणून पूर्णपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे काम आम्ही करीत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देऊन कामकाजाची सुरुवात**

आमचे सरकार आल्यानंतर त्याच्या कामकाजाची सुरुवात शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देऊन केली. कोरानाच्या संकटाला दीड वर्षापासुन राज्य तोंड देत आहे. मात्र या काळात शेतकऱ्यांनी अर्थव्यवस्थेत जे योगदान दिले आहे ते विसरता येण्यासारखे नाही, असे सांगतांनाच उद्योगाप्रमाणे शेतीतही नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन दर्जोन्नती केली पाहिजे. त्यासाठी राज्य शासनाने विकेल ते पिकेल ही योजना सुरु केली. शेतकरी जे पिकवेल ते विकले गेले पाहिजे. त्याला हमी भाव नाही तर हमखास




भाव मिळाला पाहिजे अशी आमची भुमिका असल्याचे श्री.ठाकरे यांनी सांगितले. हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईकांची परंपरा पुढे नेत असतानाच राज्यातील शेतकरी हिताला धक्का लागेल अशी एकही बाब राज्यात होऊ देणार नाही. असे सांगतांनाच शेतकऱ्यांनी प्रयोगशिलता जपली पाहिजे. मर्यादित स्वरुपात प्रयोग करीत राहिले पाहिजे. त्या प्रयत्नांना बळ देण्याचे काम एकत्रितपणे केले जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**कृषी प्रक्रिया उद्योगाला चालना-उपमुख्यमंत्री**

शेतकऱ्यांच्या पारंपरिक ज्ञानाला आणि अनुभवाला तंत्रज्ञानाचा जोड मिळाल्यास त्याचा नक्की फायदा होईल. कृषी संजीवनी मोहिमेच्या माध्यमातून त्याला सुरुवात झाल्याचे उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी यावेळी सांगितले. राज्यात कृषी मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाला चालना देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असून पिकांची उत्पादकता, गुणवत्ता आणि तंत्रज्ञान या त्रिसूत्रीचा वापर करीत कृषी विभागाचे काम चांगल्या पद्धतीने सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

**प्रयोगशील शेतकरी हे स्वतंत्र विद्यापीठ-महसूल मंत्री**

प्रयोगशिल शेतकरी हे स्वतंत्र विद्यापीठ असल्याचे महसूल मंत्री श्री. थोरात यांनी सांगितले. उत्पादकता वाढल्यास शेती परवडणारी होऊ शकते. शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन त्यांना मार्गदर्शन करणारे कृषीमंत्री दादाजी भुसेंच्या माध्यमातून लाभले असून ते मनापासून काम करीत असल्याचे मंत्री थोरात यांनी यावेळी सांगितले. पीक स्पर्धा विजेत्या शेतकऱ्यांचे अनुभव शब्दबद्ध आणि चित्रीत करुन ते राज्यातील अन्य शेतकऱ्यांपर्यत पोहोचविले पाहिजे असेही त्यांनी सांगितले.

**मोहिमेत ७ लाख शेतकऱ्यांचा सहभाग-कृषीमंत्री**

राज्यात दरवर्षी कृषीसंजीवनी मोहिम कृषी दिनापासून आयोजित केली जाते. यावर्षी मात्र कृषीदिनाच्या आठवडाभर ही मोहिम राबवून खरिपासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. शेकडो शास्त्रज्ञ, कृषी अधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मार्गदर्शन केले. या मोहिमेत ७ लाख शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला असून मोहिम काळात प्रत्येक दिवशी वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आल्याचे कृषीमंत्री श्री. भुसे यांनी सांगितले.

राज्यात कृषी मालावर प्रक्रिया करण्यासाठी विविध योजना एकाच छताखाली आणून प्रक्रिया उद्योगाला चालना देण्याकरीता अन्न प्रक्रिया संचालनालयाची निर्मिती, कृषीमाल विक्री व्यवस्था बळकट करणे, बियाण्यांबाबत महाराष्ट्राला गतवैभव प्राप्त करुन देणे यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकरी अन्न देवता असल्याचा उल्लेख कृषीमंत्र्यांनी यावेळी केला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी रब्बी हंगाम २०२० मधील पिक स्पर्धेतील विजेत्या शेतकऱ्यांचा प्रातिनिधिक स्वरुपात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. साहेबराव चिकणे, सातारा, सुहास बर्वे, सिन्नर, वसंत कचरे, खटाव, राजेश हाळदे, देगलुर, आट्या पाडवी, तळोजा, विठ्ठल आवारी, ईगतपुरी, हिराचंद गावीत, कळवण या विजेत्या शेतकऱ्यांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांनी पिकविलेल्या धान्याची भेट मुख्यमंत्र्यांनी देण्यात आली. यावेळी कृषी राज्यमंत्री डॉ.कदम यांनी आभार मानले. कृषी विभागाचे सचिव एकनाथ डवले, पोक्रा प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक विकास रस्तोगी, कृषी संचालक विकास पाटील यांच्यासह कृषी अधिकारी उपस्थित होते.

# कोविडमुळे कुटुंब प्रमुखाचा मृत्यु झाला आहे अश्यांनी कुटुंबाचे पुर्नवसन करण्यारिता अर्ज करावे

**पालघर/प्रतिनिधी**

एनएसएफडीसी नवी दिल्ली यांच्या माध्यमातून महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ यांच्यामार्फत कोविड-१९ या जागतिक महामारीत अनुसूचित जातीच्या कुटुंबप्रमुखाचा मृत्यु झाला आहे. त्या कुटुंबियाचे पुनर्वसन करण्यासाठी and Support for Marginalized Individuals for Livelihoods Enterprie (SMILE) ही व्यवसायासाठी कर्ज देण्याची योजना विचाराधीन आहे. सदर योजनेची माहीती आणि अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहे. तपशील/प्रकल्प मूल्य -रूपये १.०० लाख ते ५.०० लाखापर्यत, एनएसएफडीसी सहभाग- ८०%, भांडवल अनुदान-२०%, व्याजदर-६% परतफेडीचा कालावधी- ६ वर्षे सदर योजनेसाठी खालीलप्रमाणे पात्रता राहिल. १) अर्जदार अनुसूचित जातीतील असावा. २) अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न रुपये ३.०० लाख पर्यत असावे. ३) अर्जदार हा कोरोनामुळे मृत्यु पावलेल्या कुटुंब प्रमुखाच्या कुटुंबातील सदस्य असावा (कुटुंब प्रमुखाच्या रेशनकार्डवर सदर सदस्याचे नाव असणे बंधनकारक) ४) मृत्यु पावलेल्या व्यक्तीची वयोमर्यादा १८ ते ६० च्या दरम्यान असावी. मृत्यु पावलेल्या कुटुंब प्रमुखाची मिळकत कुटुंबाच्या एकूण मिळकतीपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. ५) कोरोनामुळे मृत्यु पावलेल्या व्यक्तींकरिता पुढील पैकी एक दस्तावेज आवश्यक आहेत. अ) महानगर पालिका/ नगरपालिका यांनी दिलेले मृत्यु प्रमाणपत्र आ) स्मशानभूमी प्राधिकरणारे दिलेली पावती इ) एखादया गावात स्मशानभूमी नसल्यास गट विकास अधिकाऱ्याने दिलेले मृत्यु प्रमाणपत्र आवश्यक कागदपत्रे : १) मयत व्यक्तीचे नाव पत्ता २) आधारकार्ड ३) उत्पनाचा दाखला (३.०० लाखा पर्यत) ४) कोविड- १९ मुळे मरण पावलेल्या व्यक्तीचा मृत्युचा दाखला ५) वयाचा पुरावा ६) रेशन कार्ड. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे १५ जून २०२१ पर्यत मृत्यु झालेल्या अनुसूचित जातीतील (SC) कुटुंबातील व्यक्तीने उपरोक्त वरील माहीती महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात अथवा ह्या लिंकवर https://forms.gle/7mG8CMecLknW Gt6K7 दि. ३०/०६/२०२१पर्यत भरण्यात यावी. असे आवाहन महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्या.) जिल्हा व्यवस्थापक, पालघर यांनी कळविले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

05 TO 11 JULY 2021 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 03/07/2021 9:19 PM Page 1



# काँग्रेस पक्षाच्या विमुक्त भटक्या जाती, जमाती सेल प्रदेशाध्यक्ष पदी मदन जाधव यांची निवड!

## प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सत्कार

**मुंबई/प्रतिनिधी**

राष्ट्रीय बंजारा टायगर्स चे राष्ट्रीय कार्याध्यक्ष, बंजारा व भटक्या विमुक्त समाजाचे युवा नेते, समाजसेवक तथा जामनेर, जळगाव येथील सामाजिक कार्यकर्ते मा.मदनभाऊ जाधव यांचे बंजारा व भटक्या-विमुक्त समाजातील कार्याची दखल घेऊन आज भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा.नानाभाऊ पटोले यांनी हरितक्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार 'कै.वसंतरावजी नाईकसाहेब यांच्या १०८'व्या जयंतीनिमीत्त आयोजित एका कार्यक्रमामधे नियुक्तीपत्र देऊन निवड केली. यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटी सरचिटणीस राजीवजी शुक्ला,प्रदेश कार्याध्यक्ष चंद्रकांत हंडोरे, उपाध्यक्ष संजयभाऊ राठोड, मोहन जोशी, हुसेन दलवाई, सचिव संजय झाडे पाटील, मुंबई काँग्रेस उपाध्यक्ष झिया उल रहेमान, सरचिटणीस डॉ.गजानन देसाई, युवक काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष मिलींद खराडे, प्रदेश सरचिटणीस देवानंद पवार, मधु चव्हाण, प्रमोद मोरे, शाह आलम शेख, प्रदेश प्रवक्ता अतुलजी लोंढे, ठाणे जिल्हाध्यक्ष राकेश पाटील, काँग्रेस नेते मोईन काझी, भारत राठोड, राजाराम पवार, लक्ष्मण म्हस्के, डॉ.प्रियंका राठोड इत्यादी मान्यवर उपस्थित होते. मा.मदनभाऊ जाधव हे गेल्या १०-१५ वर्षापासून सामाजिक कार्यात नेहमीच



अग्रेसर असतात. मदनभाऊ हे कल्याण येथील तिज महोत्सव कृती समितीचे अध्यक्ष असून या समितीच्या वतीने त्यांनी कल्याण व मुंबई परिसरासह सर्व बंजारा व भटक्या विमुक्त समाजाला एकत्र करण्यासाठी प्रयत्न करीत असतात आणि मदनभाऊ यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम दरवर्षी अतिशय जोरदार होत असतो.या कार्यक्रमाची ओळख महाराष्ट्रासह संपूर्ण देशात आज बंजारा समाजाचा तिज सण प्रसिद्ध झालेला आहे.

याचबरोबर मदनभाऊ जाधव हे बंजारा भटक्या विमुक्त समाजाच्या विविध अडी अडचणी व समस्या सोडविण्यासाठी नेहमीच प्रयत्नरत असतात आणि त्या सोडविल्याशिवाय ते शांत बसतच नाही. जामनेर तालुक्यातील युवा नेतृत्व म्हणून मदनभाऊ जाधव यांची ओळख आहे. ते तालुक्यातील सर्व समाजात परिचीत आहेतच परंतु, विविध कार्यक्रमानी त्यांची ओळख अजून घट्ट झालेली आहे.त्यामध्ये त्यांचा दरवर्षी होणाऱ्या वाढदिवसानिमीत्त विविध प्रकारचे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आरोग्य शिबीर असे कार्यक्रम ते घेत असतात. म्हणूनच मा.मदनभाऊ जाधव यांनी केलेल्या विविध प्रकारच्या सामाजिक कार्याची ओळख आज काँग्रेस पक्षाने घेतली असून मदनभाऊ जाधव यांच्या निवडीने जामनेर तालुक्यासह, संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील बंजारा व भटक्या विमुक्त समाजामधे आनंद झाला आहे. मदनभाऊ जाधव यांची भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या भटक्या विमुक्त सेलच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल राष्ट्रीय बंजारा टायगर्सचे राष्ट्रीय अध्यक्ष आत्मारामभाऊ जाधव, राष्ट्रीय उपाध्यक्ष विरेंद्रजी रत्ने, अमृतजी मेढकर, आत्मारामजी जाधव (गुजरात), राष्ट्रीय महासचिव वाल्मिकजी पवार, राष्ट्रीय सरचिटणीस अनिलभाऊ पवार, राष्ट्रीय कोषाध्यक्ष राजेशजी नाईक, राष्ट्रीय सचिव गणपती राठोड, माजी प्रदेशाध्यक्ष तथा जय सेवालाल बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोकभाऊ चव्हाण, प्रदेश काँग्रेस कार्यकारीणी सदस्य मुलचंदजी नाईक, जळगाव जिल्हाध्यक्ष ॲड. संदिपभैय्या पाटिल, जामनेर तालुकाध्यक्ष शरदजी पाटिल, माजी तालुकाध्यक्ष शंकरभाई राजपूत, संघटनेचे प्रदेशाध्यक्ष गजानन जाधव, प्रदेश कार्याध्यक्ष आनंदभाई चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष विलास जाधव, शेषरावदादा आडे, प्रदेश सरचिटणीस भारतभाऊ राठोड, प्रदेश सल्लागार शंकरभाई पवार, प्रदेश सहसंघटक भास्कर आडे, प्रदेश प्रवक्ता सतिषजी राठोड, प्रदेश समन्वयक रवि राठोड, सोशल मिडिया प्रमुख मच्छिंद्र चव्हाण, प्रदेश सचिव सुरेश पवार, मुंबई अध्यक्ष रोहित राठोड, कल्याण तालुकाध्यक्ष अशोकभाऊ राठोड, तालुका सचिव-केवलसिंग तंवर, कल्याण शहराध्यक्ष ज्ञानेश्वर राठोड, जामनेर तालुका काँग्रेस पदाधिकारी मा. ज्योत्सनाताई विसपूते, डॉ.ऐश्वरी राठोड, संजय राठोड यांच्यासह समाजातील विविध सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर तसेच पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आहे.

# पालघर येथे वसंतराव नाईक यांची जंयती साजरी; पुष्पहार अर्पण करुन केले अभिवादन!



**पालघर/प्रतिनिधी**

१ जुलै २०२१ रोजी वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय पालघर येथे हरितक्रांतीचे प्रणेते तसेच महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. वसंतराव नाईक यांचा जन्म १ जुलै १९१३ रोजी पुसद या गावी, यवतमाळ जिल्हामध्ये झाला. वसंतराव नाईक हे मराठी राजकारणी होते. दि. ५, डिसेंबर १९६३ ते २० फेब्रुवारी १९७५ या कालखंडा दरम्यान ते महाराष्ट्र राज्याचे १२ वर्ष मुख्यमंत्री होते. वसंतराव नाईक हे महाराष्ट्र राज्याचे तिसरे मुख्यमंत्री व एक कृषितज्ञ होते. त्यानी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून सर्वाधिक काळ राज्यभार सांभाळला. वसंतराव नाईक हे यवतमाळ जिल्ह्यातल्या पुसद या गावाजवळील गहुली या छोट्याश्या खेड्यातील एका सधन शेतकरी कुटुंबातील होते. त्यांनी सर्वात पहिले पुसद नगरपालिकेचे अध्यक्षपद भूषविले होते. ते महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकप्रिय नेते होते. हरित क्रांतीचे प्रणेते अशी त्यांची ओळख होती. या आयोजित कार्यक्रमात वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले रवी भगवान राठोड प्रदेश समन्वयक राष्ट्रीय बंजारा टायगर्स, बळीराम चव्हाण जिल्हा उपाध्यक्ष राष्ट्रीय बंजारा टायगर्स, राम चव्हाण जिल्हा सचिव, राहुल राठोड जिल्हा अध्यक्ष राष्ट्रीय बंजारा युवा टायगर्स, प्रदीप राठोड विनोद चव्हाण, विठ्ठल राठोड, अजय राठोड, संदीप राठोड, माजी सैनिक भाऊरावजी तायडे,समाज कल्याण अधिकारी हर्षा सर, जिल्हा समनव्ययक रमेश राठोड, जातपडताळणी कार्यालयाचे प्रकाश तायडे, महिला बाल विकास अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यासर्व मान्यवरांनी व अधिकारी- कर्मचाऱ्यांनीही यावेळी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. वसंतराव नाईक विमुक्त जाती भटक्या जमाती विकास महामंडळाच्या ज्योती अनिल कांबळे यांनी कार्यक्रमाचे आयोजन जिल्हा व्यवस्थापक किशोर वाणी यांच्या मार्गदर्शनाखाली केले. शेवटी ज्योती अनिल कांबळे यांनी आलेल्या सर्व मान्यवरांचे आभार मानले.

# वसई-विरार महापालिका निवडणूक विभागाचे सहा.आयुक्त प्रेमसिंग जाधव यांची सेवानिवृत्ती



**वसई/प्रतिनिधी**

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या निवडणूक विभागाचे सहा. आयुक्त प्रेमसिंग नामदेव जाधव हे आज सेवा निवृत्त झाले. त्यांना त्यांच्या विभागातून सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांनी भावपूर्ण शब्दात त्यांच्या वसई विरार महापालिकेतील सेवेचा गौरव करुन शुभेच्छा दिल्या.

१९८६ साली विरार नगरपरिषदेत प्रेमसिंग जाधव लिपिक म्हणून सेवेत रुजू झाले. नम्र स्वभाव व वागणे-बोलणे तसेच कुठल्याही विभागाची जबाबदारी वरिष्ठांनी सोपविल्यानंतर ती रात्रंदिवस काम करुन पार पाडणे हे त्यांचे वैशिष्ट्य. पालिकेने आयोजित केलेला कला-क्रीडा महोत्सव त्यांनी सतत सात वर्षे त्याची सर्व जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. कोणतेही काम वरिष्ठांनी सोपविल्यानंतर त्याला न्याय देणे तसेच कितीही कटू अनुभव आले तरी नोकरीच्या कारकिर्दीत न मानवणारे चढ-उतार आले तरी त्यांनी सेवेचा काळ लोकांशी व पालिकेच्या कामाशी इमानइतबारे जबाबदारी पार पाडून आपल्या सेवेत कामाविषयीची तळमळ दाखविली.

अनेकांना प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडताना आपल्या स्वभाव वैशिष्टयाने आपलेसे करणारे प्रेमसिंग जाधव आपल्या सेवेसाठी यापुढेही ओळखले जातील अशा शब्दात अनेकांनी आपल्या जाधव यांचे सेवेविषयीच्या भावना व्यक्त केल्या.

# श्री केशवराज शैक्षणिक संकुलाच्या गुणवत्तेची गुढी उंच फडकत राहील - शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे

**लातूर/प्रतिनिधी**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा ज्ञानयज्ञ मागील ७० वर्षांपासून अखंडपणे व आत्मीयतेने सुरू आहे. संस्थेची ही वाटचाल अभिमानास्पद असून या संस्थेच्या गुणवत्तेची गुढी सतत उंच फडकत राहील, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती तृप्ती अंधारे यांनी व्यक्त केले. भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या वर्धापन दिना निमित्त श्री केशवराज शैक्षणिक संकुलात कोविड योद्धांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना श्रीमती अंधारे बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष यशवंतराव देशपांडे तावशीकर तर मंचावर भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह नितीन शेटे, विद्यासभा अध्यक्ष किरणराव भावठाणकर,डॉ. विश्वास कुलकर्णी, केशवराज विद्यालयाच्या अर्थ समितीचे सदस्य ॲड.जगन्नाथराव चिताडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना श्रीमती अंधारे म्हणाल्या की, संस्थेच्या ज्ञानसाधनेच्या सार्थकतेचा हा दिवस आहे. ज्या उद्देशाने संस्थेची स्थापना करण्यात आली तो न विसरता प्रत्येक घटक अखंडपणे कार्यरत आहे. प्रत्येकाला आपापल्या जबाबदारीची जाणीव आहे. संस्थेच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या प्रत्येक उपक्रमात सौंदर्य, उपक्रमशीलता आणि वेगळेपण जाणवते. संस्थेच्या आजवरच्या यशात प्रत्येकाचा समान वाटा आहे. संस्थेच्या कर्तृत्वाचा हा ठसा असाच वर्धिष्णू होत राहील. विविध आव्हाने समोर असली तरी संस्थेच्या गुणवत्तेची गुढी उंच



फडकत राहील, असेही त्या म्हणाल्या. प्रारंभी ॲड.जगन्नाथराव चिताडे यांनी संस्थेच्या वतीने दि.२१ ते २८ जून दरम्यान राबवण्यात आलेल्या योग सप्ताहाची माहिती दिली. दररोज १२०० व्यक्तींनी योग अभ्यास शिबिराचा लाभ घेतल्याचे ते म्हणाले. संस्थेचा परिचय करून देताना किरणराव भावठाणकर यांनी सांगितले की,वर्धापन दिन साजरा करणे म्हणजे आपल्यावर असणाऱ्या जबाबदारीची जाणीव ठेवणे होय. शिक्षणाची नेमकी व्याख्या लक्षात घेत वेगळ्या वाटा चोखाळणारी ही संस्था आहे. देशाचा जबाबदार व जागरूक नागरिक घडविण्याचे काम संस्थेच्या माध्यमातून केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना यशवंतराव देशपांडे यांनी गुणवान व चारित्र्यसंपन्न नागरिक घडवणे हेच कर्तव्य मानून सुरु असणारी संस्थेची वाटचाल यापुढेही अशीच सुरू राहील, असे मत व्यक्त केले. यावेळी पोलिस उपाधीक्षक प्रिया पाटील, किल्लारीचे पोलीस उपनिरीक्षक अमोल गुंडे, पोलीस कॉन्स्टेबल गजानन जाधव, डॉ.सदानंद कांबळे, मनपाच्या सेवेतील परिचारिका सावित्री किरवले, आशासेविका अनुरेखा वाघमारे, मनपाच्या शववाहिकेचे चालक राजकुमार सोंट, जवळपास २३०० कोरोनाबाधित व्यक्तींवर अंत्यसंस्कार करणारे मुकिंद सरवदे, सामाजिक गरज ओळखून ऑक्सिजन निर्मिती प्रकल्प उभारणीसाठी पुढाकार घेणारे डॉ.विश्वास कुलकर्णी, मनपाच्या स्वच्छता कर्मचारी कुसुमताई रसाळ यांचा कोविड योद्धा म्हणून सत्कार करण्यात आला.श्रीमती तृप्ती अंधारे, किरणराव भावठाणकर, यशवंतराव देशपांडे तावशीकर यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह,पुस्तक व उपरणे देऊन या योद्ध्यांना सन्मानित करण्यात आले. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संस्था ध्वजारोहण, प्रतिमापूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. प्रल्हाद माले यांनी प्रास्ताविक तर धनंजय कुलकर्णी, आनंदराज देशपांडे, कार्यवाह नितीन शेटे, डॉ.मनोज शिरुरे, अलिशा अग्रवाल, शिवाजी शेंडगे यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. श्रीमती कांचन तोडकर यांनी वैयक्तिक गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती संपदा देशपांडे तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक शिवाजी शेंडगे यांनी केले.

### रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचा उपक्रम

# कृषी दिनानिमित्त प्रयोगशील शेतकऱ्यांचा सत्कार

**लातूर/प्रतिनिधी**

कृषी दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या वतीने मौजे बोकनगाव येथे आयोजित शेतकरी सत्कार सोहळ्यात प्रयोगशील शेती करणाऱ्या पुरुष व महिला, युवा शेतकरी तसेच शासकीय कृषी अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मांजरा सहकारी कारखान्याचे संचालक डॉ धनंजय दाताळ यांची उपस्थिती होती.यावेळी निवृत्त कृषी अधिकारी रमेश चिल्ले यांनी शेतकऱ्यांना शेतीविषयक मार्गदर्शन केले. रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे नुतन अध्यक्ष सतीश कडेल यांनी रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन मार्फत चालविण्यात येणाऱ्या कृषी तसेच विविध सामाजिक उपक्रमांबद्दल माहिती दिली. याप्रसंगी लातुरचे उपविभागीय कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पन्न देणाऱ्या पिकांची लागवड कशी करावी याबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून आनंदवाडी या हरितक्रांती व




आदर्श ग्राम पुरस्कार प्राप्त गावातील शिवाजी चामे यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष धनंजय दाताळ यांनी महिलांनी सुद्धा पुरुषांच्या बरोबरीने योगदान देऊन हरितक्रांती कशी साकार करता येईल यासंदर्भात मार्गदर्शन केले.कृषी दिनानिमित्त बोकनगाव व परिसरातील आदर्श शेतकरी दाजीराव दाताळ, माधव दाताळ, महिला शेतकरी सौ.अर्चना शिंदे व जयश्री बाजूळगे,युवा शेतकरी रामा माने, शेतकरी मित्र शिवाजी दाताळ, कृषी सहाय्यक रविकिरण इंगळे आणि निवृत्त कृषी अधिकारी व रोटरी सदस्य अनिल पाटील यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास बोकनगाव व परिसरातील शेतकरी पुरुष व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश चिल्ले तर आभारप्रदर्शन रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन चे सचिव दिनेश सोनी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोटरीचे प्रोजेक्ट चेअरमन किशोर दाताळ, रवी जोशी, डॉ राजाराम दावनकार, रवींद्र बनकर, प्रल्हाद बंडापल्ले, अनिल पाटील, बालाप्रसाद अग्रोया, चंद्रप्रभु जंगमे आदींनी परिश्रम घेतले.

# सिव्हिल मधून धूम ठोकलेल्या दोघां आरोपींना सोलापूर शहर गुन्हे शाखेने ठोकल्या बेड्या

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर शहरातील सिव्हिल रुग्णालयातून पोलिसांचा नजर चुकवून धूम ठोकलेल्या आरोपींना सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. आरोपीविरुद्ध ग्रामीण तसेच शहर पोलीस ठाण्यात दरोडा आणि मोटारसायकल चोरीचे गुन्हे दाखल आहेत. पथकाने आरोपींनी केलेल्या गुन्ह्यांची उकल करीत १ लाख ३५ हजार रुपयांचा माल हस्तगत केला आहे. विकास उर्फ विकी देवा पवार (२४) व अजय सिद्राम चौगुले (२०) अशी जेरबंद करण्यात आलेल्या आरोपीची नांवे आहेत. दोघांविरुद वळसंग पोलीस ठाण्यात व तसेच शहरातील विविध पोलीस ठाण्यात १० पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहेत. वळसंग पोलीस ठाण्याच्या परिसरात घडलेल्या गुन्ह्यात त्यांना न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचा आदेश झाला होता. त्यामुळे त्यांची कोरोना चाचणी करण्याकरिता सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. गुरुवारी २४ जून रोजी सिव्हिल



हॉस्पिटलमधून पळून जाण्यासाठी दोघांनी मिळून संगनमत केले. त्यानंतर त्यांनी बाथरूमला जाण्याचा बहाणा केला. तेथील खिडकीच्या लोखंडी अँगलची चौकट त्यांनी काढली आणि तेथून ते बाहेर पडले. बराच वेळ आरोपी बाहेर येत नसल्याने संशय व्यक्त झाला. तोपर्यंत आरोपींनी तेथून पळ काढला होता. ही सदर कारवाई सोलापूर शहर पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, पोलीस उपायुक्त (गुन्हे) बापू बांगर, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजय साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शैलेश खेडकर, पोलीस हेड कॉन्स्टेबल अशोक लोखंडे, इमाम इनामदार, शंकर मुळे, राजेश चव्हाण, विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, संतोष येळे व सुहास अर्जुन यांनी पार पाडली आहे.

05 TO 11 JULY 2021 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 03/07/2021 9:20 PM Page 1



# मुख्य रस्त्यावरील धोकादायक विद्युत खांब हलवीण्याची मागणी



**वाडा/प्रतिनिधी**

वाड्यातील खंडेश्वरी नाका ते देवगाव या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम मागील दोन वर्षापासून चालू आहे. दरम्यान अजूनही काही ठिकाणी रुंदीकरण होणे आहे. तसेच जुन्या रस्त्याच्या कडेला असलेले विद्युत तारांचे खांब आता रस्ता रुंदीकरणा नंतर रस्त्याच्या मध्ये आले असल्याने वाहतुकीस अडथळा ठरत आहेत. मुख्य बाजार पेठेतील मशिदी समोर असलेला एक खांब अगदी रस्त्याच्या मधोमध असल्याने या ठिकाणी अपघाताची शक्यता वर्तविण्यात येत आहे. खंडेश्वरी नाका ते परळीनाका दम्यान अनेक विद्युत खांब हलवले नसल्याने या खांबाचा आधार घेऊन काही अनधिकृत फेरीवाले या ठिकाणी आपली दुकानं मांडत असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. हे खांब नवीन गटारींना अडचणीचे होत असल्याने गटारींची कामे पण अपूर्ण राहिली आहेत. परिणामी अतिवृष्टी झाली तर शहराच्या मुख्य रस्त्यावर पाणी तुंबने, वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अपघातही होऊ शकतात यासाठी रस्त्यात अडथळा होत असलेले विद्युत खांब योग्य ठिकाणी हलवणे व गटारींची कामे लवकरच करण्याची मागणी येथील सामाजिक कार्यकर्ते अनंता वणगा यांनी केली आहे. दरम्यान पोल शिफ्टिंगचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाचे असून त्यांनी ठेकेदारामार्फत हे काम करून घेणे आवश्यक आहे, असे वीज वितरण कंपनीचे वाडा शाखेचे उपअभियंता ज्ञानेश्वर वट्टमवार यांनी सांगितले. तर रस्ता रुंदीकरणासह पोल शिफ्टिंगचे कामही कंत्राटदाराचे असून, या बाबत लवकरच त्यांच्याशी बोलतो, असे वाडा सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रभारी उपअभियंता अनिल भरसट यांनी स्पष्ट केले.

# दारुड्या बापाने केला दीड वर्षीय चिमुकलीचा खून

**औसा/शिवाजी मोरे**

**लातुर जिल्ह्यातील भादा पोलिस ठाणे हाद्दीतील आशिव गावातील एका दारुड्या बापाने पोटच्या दीड वर्षीय मुलीचा खुन केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी मुलीच्या आजोबांनी दिलेल्या फि र्यादिवरून भादा पोलिस ठाण्यात गुन्हादाखल करण्यात आला असून आरोपी संतोष भोंडे याला अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे.**

याबाबत अधिक माहीती अशी की, औसा तालुक्यातील आशिव येथील संतोष गंगादास भोंडे (वय तीस वर्ष) हा सतत या ना त्या कारणाने दारू पिऊन आपल्या पत्नीवर संशय घ्यायचा. यातून मग त्यांच्यात वाद होणे नित्याचेच होऊन बसले होते! संतोषला दोन मुली एक मुलगा अशी अपत्य होती. संशयाचे भूत मानगुटीवर बसले की, तो पत्नी सोबतच या लहान मुलांना, मुलींना बदडून काढायचा! तो सतत मारहाण करायचा. सतत दारूच्या आहरी गेलेला संतोष भोंडे काही काम-धंदा करीत नव्हाता. दररोज दारू पिणे आणी बायकोला भांडणे असाच त्याचा नित्य क्रम होता. दिनांक २५ जून रोजी सकाळी घरातील गंगादास भोंडे, लक्ष्मीबाई गंगादास भोंडे, पूजा संतोष भोंडे हे सर्व जण शेतात कामासाठी गेले होते. घरात संतोष आणि त्याची लहान मुलगी ईश्वरी, सृष्टी आणि मुलगा विश्व हे खेळत होते. संध्याकाळी सहा वाजल्यानंतर शेतात गेलेले सर्वजण घरी परतले. घरी आल्यानंतर त्यांच्या नजरेसमोर सृष्टी दिसत नव्हती. दीड वर्षाची सृष्टी कुठे गेली? याचा शोध सुरू झाला. छकुली उर्फ सृष्टी तिच्या संदर्भात ईश्वरी व विश्व यांना विचारले असता, त्या चिमुकल्यांनी सांगितले की सृष्टी हिला पप्पांनी मारहाण करून पाण्याच्या हौदात फेकून दिले आहे. थोड्या वेळानंतर सृष्टी शांत झाल्याने आम्हाला खेळण्यासाठी बाहेर पाठवून दिले. असे लेकरांनी सांगताच सृष्टीच्या आईचे काळीज फाटले! तिने हंबरडा फोडला! आणि सासू-सासरे यासह ती पाण्याच्या हौदाकडे धावली. हौदामध्ये सृष्टीचा मृतदेह आढळून आला. ही बातमी गावात



वणव्यासारखी पसरली, आणि हां हां म्हणता अख्खा गाव संतोष भोंडे त्याच्या घराकडे धावला. लोकांची एकच गर्दी झाली. दरम्यान या घटनेची माहिती भादा पोलिसांना देण्यात आली. घटनेचे गांर्भिय ओळखून भादा पोलीस लगेच घटनास्थळाकडे धावत आले. याप्रकरणी गंगादास भोंडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संतोष भोंडे यांच्या विरुद्ध भादा पोलीस स्टेशन येथे कलम ३०२ भारतीय दंड विधान संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून हैवान बनलेल्या संतोष भोंडे या आरोपीला भादा पोलिसांनी अटक केली आहे. लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मतराव जाधव, औसा उपविभागाचे उपविभागीय पोलिस अधिक ारी राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि नानासाहेब लिंगे, पोलीस उपनिरीक्षक महेश मुळीक हे अधिक तपास करीत आहेत.

पान १ वरून....

## सासरच्या लोकांनी तिचा भयंकर छळ...

महिलेचे नाव असून.ही घटना दि ३० जून सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास अक्कलकोट शहरात निदर्शनास आली.पती,दिर व जाऊ यांच्या विरुद्ध अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आली असून आरोपी पतीस ५ जुलै पर्यत पोलीस कोठडी मिळाली असून यातील दोघे आरोपी फरार असून अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी त्यांचा शोध घेत आहेत. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, मयत पुतळाबाई शिवराज मलगोंडा ह्या आपले पती शिवराज सोबत हनूर नाका अक्कलकोट येथे वास्तव्यास होते. मयत पुतळाबाई यांची सासरी मोठी प्रॉपर्टी असून पती शिवराज मलगोंडा यांना दारू पिण्याचे व्यसन असल्याने प्रॉपर्टीचे कामकाज दिर देवराज बसवराज मलगोंडा हे पाहतात. मयत पुतळाबाई सोबत पती शिवराज व दिर देवराज हे प्रॉपर्टीवरून वाद करून पुतळाबाईस त्रास देत होते.आणि चारित्र्यावरुन संशय घेत छळ करत होते. या विषयी पुतळाबाई ह्या आपल्या माहेरी वागदरी ता अक्कलकोट येथे आल्यावर आपल्या आई वडिलांना होणाऱ्या त्रासाविषयी सांगायच्या. त्यानंतर पुतळाबाईचे आई वडील सासरच्या लोकांची समजूत काढून याचेचे तरीही सासरचे लोक मयत पुतळाबाईस त्रास द्यायचे.दि ३० जून रोजी मयत पुतळाबाई मलगोंडा राहत्या घरी बेशुद्ध पडलेल्या अवस्थेत असल्याचे शेजारी लोकांनी वडील मल्लिनाथ शेळके यांना फोनद्वारे कळवताच आई वडील भाऊ व गावातील इतर लोक मयत पुतळाबाई मलगोंडा यांच्या घरी गेले त्यावेळी पुतळाबाई ह्या बेशुद्ध अवस्थेत पडल्या होत्या.घटनास्थळी पोलीस कर्मचारी उपस्थित होते. पोलिसांनी मयत पुतळाबाई यांना उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल करून तपासणी केले असता डॉक्टरांनी मयत झाल्याचे सांगितले. सदर मयताची खबर वडील मल्लिनाथ आप्पासाहेब शेळके यांनी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात दिली. मयताचा पंचनामा झाल्यानंतर शवविच्छेदन करून डॉक्टरांनी गुदमरून मयत झाल्याचे प्रमाणपत्र दिले.या अगोदर म्हणजे दि २४ जून रोजी सायंकाळी ७ वाजता मयत पुतळाबाईस पती शिवराज यांने चारित्र्याचा संशय घेऊन लाथाबुक्यांनी मारहाण केली होती. याबाबत दि २५ जून रोजी पती शिवराज दिर देवराज व जाऊ गंगोत्री मलगोंडा यांच्याविरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून त्याच दिवशी माहेरी (वागदरी) गेले होते.दि २८ रोजी सासरी निघून गेल्या. दि ३० जून रोजी सकाळी ११ च्या सुमारास मयत पुतळाबाई शिवराज मलगोंडा वय ३३ यांचे सासरी मोठ्या प्रमाणात प्रॉपर्टी असून याबाबत सतत वाद चालू होते.पती शिवराज दिर देवराज व जाऊ गंगोत्री हे सर्वजण मयत पुतळाबाईस तुला प्रॉपर्टी वाटून देणार नाही असे म्हणत चारित्र्यावर संशय घेत वेळोवेळी लथाबुक्यांनी मारहाण, शिवीगाळ, दमदाटी केली होती. दि ३० रोजी मयत पुतळाबाई मलगोंडा यांना वरील संशयित आरोपी पती दिर व जाऊ यांनी मिळून नाकातोंडावर उशी सारख्या वस्तूने दाबून तिला ठार मारले आहे म्हणून पती शिवराज बसवराज मलगोंडा रा हनूर नाका अक्कलकोट, दिर देवराज बसवराज मलगोंडा व जाऊ गंगोत्री देवराज मलगोंडा दोघे रा फत्तेसिंग मैदान बाजूला अक्कलकोट यांच्या विरुद्ध बसवराज मल्लिनाथ शेळके वय ३६ रा वागदरी यांनी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. गुन्हा निदर्शनास येताच आरोपी शिवराज बसवराज मलगोंडा यास पोलिसांनी ताब्यात घेतले १ जुलै रोजी न्यायालयात उभे केले असता ५ जुलै पर्यत पोलीस कोठडी सुनावली असून दोघे आरोपी फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक गोपाळ पवार हे करीत आहेत.

## वासनांध नराधमाना लाज लज्ञा ...

केले. गोविंदाचे महिमाच्या आईसोबत प्रत्यक्षात हे तिसरे लग्न होते. गोविंदाचे महिमाच्या आईसोबत तिसरे लग्न असले तरी हे दुसरे लग्न असल्याचे त्याने खोटे कथन केले होते. जळगाव शहराच्या उच्चभ्रु परिसरातील एका संकुलाच्या तळमजल्यावर गोविंदा जिम चालवत होता. त्याच संकुलात त्याचे निवासस्थान देखील होते. महिमाच्या आईने दुसरे लग्न केले होते. त्यामुळे तिला आई व सावत्र बाप गोविंदा यांच्यासोबत पुणे सोडून जळगावला राहण्यास यावे लागले. पुणे येथे आजी आणि आजोबांसोबत राहण्याची महिमाला सवय जडली होती. मात्र नाईलाजाने तिला आजी आजोबांची साथ सोडून जळगावला यावे लागले. जिम चालक गोविंदा महिमाचा सावत्र बाप होता. असे असले तरी त्याची तिच्या रुपावर वक्रदृष्टी खिळून रहात होती. पहिल्या पत्नीने घटस्फोट दिल्यानंतर देखील त्याने तिच्यावर अत्याचार केल्याचे म्हटले जाते. त्यामुळे पहिल्या पत्नीने त्याच्याविरुद्ध नागपूर जिल्ह्यातील गिट्टीखदान पोलिस स्टेशनला अत्याचाराचा गुन्हा दाखल केला असल्याचे समजते. महिमाच्या आईचा गोविंदासोबत संसार सुरु होता. काळ पुढे पुढे सरकत होता. गोविंदाचा जिमचा व्यवसाय चांगला सुरु होता. त्या व्यवसायातून त्याला चांगल्या प्रकारे उत्पन्न मिळत होते. त्यामुळे त्याच्या हातात चांगला पैसा खुळखुळ करत होता. काळानुसार महिमा तरुण झाली. तिने वयाचे अठरावे वर्ष पार केले. जळगाव येथील एका महाविद्यालयात तिने प्रवेश घेतला. स्त्रीलंपट स्वभाव असलेल्या गोविंदाची भिरभिरती नजर महिमाच्या कोवळ्या देहावर पडण्यास वेळ लागला नाही. ती त्याची सावत्र का असेना मुलगी होती. तिच्या आईसोबत त्याने लग्न केले होते. त्यामुळे नात्याने महिमा त्याची मुलगी होती. मात्र असे असले तरी गोविंदाची वक्र नजर त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. जिम असलेल्या संकुलात खालच्या मजल्यावर महिमाचे आजी व आजोबा (गोविंदाचे आई - वडील) रहात होते. वरच्या मजल्यावर महिमा आपल्या आई, सावत्र बाप व लहान बहिणीसह रहात होती. महिमाच्या आईचे गोविंदासोबत लग्न झाल्यानंतर सुरुवातीचे काही वर्ष चांगले गेले. मात्र स्त्रीलंपट स्वभाव असलेल्या गोविंदाची वक्रनजर तारुण्यात पदार्पन केलेल्या महिमावर पडण्यास कधीच सुरुवात झाली होती. तो तिच्या शरीराच्या नको त्या अवयवांना मुद्दाम स्पर्श करत होता. गुड टच आणि बॅड टच यातील फरक तिला चागंल्या प्रकारे समजत होता. चुकून हात लागला असे देखील तो तिला मुद्दाम म्हणत होता. मला हे अजिबात आवडत नाही असे एकदा महिमाने सावत्र बाप गोविंदाला निक्षून सांगितले होते. मात्र त्याच्या मनावर तिच्या बोलण्याचा काहीच फरक पडला नाही. तो तिला मुद्दाम हेतूपुरस्सर स्पर्श करतच होता. १७ फेब्रुवारी २०१९ रोजी महिमाचा १८ वा वाढदिवस होता. त्या दिवशी सायंकाळी महिमाची बहिण तिच्या आईसोबत स्विमींगला गेली होती. घरात त्यावेळी महिमा व तिचा सावत्र बाप असे दोघेच जण होते. संधी साधत गोविंदाने घराच्या हॉलमधेच तिच्यावर बळजबरी शरिरसंबंध प्रस्थापित केले. सावत्र बापाकडून मुलीवर अत्याचाराचे पाप यावेळी झाले होते. हा प्रकार कुणाला सांगायचा नाही अशी धमकीच गोविंदाने महिमाला यावेळी दिली. कुणाला हा प्रकार सांगितल्यास तुझ्या आई व लहान बहिणीला ठार करेन अशी धमकी तिला देण्यास तो विसरला नाही. या अत्याचारामुळे सप्टेबर महिन्यात महिमाच्या पोटात वेदना सुरु झाल्या. त्यामुळे तिची आई व सावत्र बाप तिला स्त्री रोग तज्ञाकडे घेऊन गेले. वैद्यकीय तपासणीअंती डॉक्टरांच्या लक्षात खरा प्रकार आला होता. डॉक्टरांनी तिला विचारले की तुझा कुणी बॉयफ्रेंड आहे काय? त्यावेळी तिने स्पष्ट शब्दात सांगितले की माझा कुणीही बॉयफ्रेंड नाही. त्यानंतर घरी आल्यावर संधी साधत वेळोवेळी सावत्र बापाकडून महिमावर अत्याचाराचा पाढा सुरुच होता. महिमाच्या आईची नजर चुकवून संधी साधून तो तिच्यावर वेळोवेळी अत्याचार करतच होता. त्याने तिला कधीही मित्र-मैत्रीण करु दिले नाही. वेळप्रसंगी तो तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्याचे देखील काम करत होता. महिमाला त्याची भिती वाटण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे तिने हा प्रकार तिच्या आईसह आजीला (गोविंदाची आई) कथन केला. मात्र तिच्या आजीने देखील तिला सहकार्य केले नाही. २३ जानेवारी २०२१ रोजी महिमाच्या आईचा वाढदिवस होता. त्या रात्री सर्वजण झोपेत असल्याची संधी साधत सावत्र बाप गोविंदाने महिमावर अत्याचार करण्यास सुरुवात केली. दरम्यान तिच्या आईला जाग आली व खरा प्रकार उघड झाला. आपल्या लेकीवर होत असलेला अत्याचार बघून महिमाच्या आईने गोविंदाच्या कानशिलात लगावली. तिच्या आईने लागलीच तिचा बचाव करत तिला आजीजवळ (गोविंदाची आई) नेले. दुसऱ्याच दिवशी तिच्या आईने तिला पुणे येथे तिच्या माहेरी रवाना केले. महिमाला पुणे येथेच शिक्षण घेण्याची इच्छा होती. मात्र गोविंदाने तिला पुणे येथे शिक्षण घेण्यास मज्जाव केला होता. महिमाने तिच्यावर बेतलेला प्रसंग पुणे येथे तिच्या आजी आजोबांना कथन केला. त्यांनी तिला वानवडी येथील फ्रिडम फर्म संस्थेच्या प्रमुख सिमा अरोळे यांच्याकडे नेले. सिमा अरोळे यांच्यासमक्ष पिंप्री चिंचवड पोलिस स्टेशनला तिने तिच्या जळगाव येथील सावत्र बापासह त्याच्या आईविरुद्ध रितसर कायदेशीर तक्रार दाखल केली. पिंप्री चिंचवड येथे शुन्य क्रमांकाने सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर तो जळगाव रामानंद नगर पोलिस स्टेशनला वर्ग करण्यात आला. रामानंद नगर पोलिस स्टेशनचे पो.नि. अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली महिमाच्या सावत्र बापाला अटक करण्यात आली. त्याला न्यायालयात हजर करण्यात आले असता ८ जून पर्यत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले. यावेळी सरकारतर्फे अॅड. निलेश चौधरी यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले.

## गुन्हेगारी वाढली कोरोनाच्या संकटकाळी...

पोलीसांना प्रत्येक गुन्ह्यात तिसरा डोळा म्हणून प्रसिद्ध असणारे सीसीटीव्ही फुटेज मोलाची कामगिरी बजावते. बऱ्याचदा पोलीस गुन्ह्यात तिसऱ्या डोळ्याची मदत घेऊनच तपासाला सुरुवात करतात.सीसीटीव्ही फुटेजमुळे असंख्य गुन्हे उघडकीस आले आहेत. ऐवढेच नाही तर याच सीसीटीव्हीमुळे गुन्ह्यातील आरोपींची हालचाल, त्यांची गुन्ह्याची पद्धत तसेच गुन्ह्यातील आरोपी कोण आहेत याचाही उलघडा याच सीसीटीव्ही फुटेजमुळे होता. याच सीसीटीव्ही फुटेजमुळे ऐका सहा महिण्याच्या बाळ चोरीचा गुन्हा नुकताच उघडकीस आला असून अपहत करण्यात आलेल्या बाळाचा शोध लावण्यात पोलीसांना यश आले असून या गुन्ह्य़ातील एका चौकडीला पोलीसांनि अटक केली आहे. सहा महिन्यांचं बाळ जे काही बोलू शकत नाही, त्याची चोरी करुन त्यांना वाटलं की, कुणाला कानोकान खबर लागणार नाही. मात्र या चोरट्यांचा पर्दाफाश तिसरा डोळा असलेल्या सीसीटीव्हीने केला. बाळाची चोरी होत असताना सीसीटीव्हीत ती चोरी स्पष्टपणे कैद झाली होती. यातील संशयीत आरोपी आणि बाळा यांचे फुटेजचे चित्रीकरण योग्य रितीने पार पडले होते. त्यामुळेच पोलीस खऱ्या गुन्हेगारांपर्यत पोहचू शकले. कल्याण स्टेशन परिसरातून बाळाची चोरी करणाऱ्या पाच जणांच्या टोळीस कल्याणच्या महात्मा फुले पोलिसांनी मोठ्या शिताफीने अटक केली. या शोध मोहिमेमध्ये सीसीटीव्हीने महत्त्वपूर्ण काम केल्यानंतर तपास पथकाला या आरोपींचा सुगावा लागला होता. या चोरट्यांनी यापूर्वी अशाप्रकारे किती बाळांची चोरी केली आहे? याचा आता कसून तपास पोलीस करत आहेत. कल्याण पश्चिमेतील स्टेशन परिसरात बेघर असलेले अनेक दाम्पत्य रस्त्यावरच झोपतात. यापैकीच एक सुनिता राजकुमार नाथ ही महिला नेहमीप्रमाणेच सहा मुलांना घेऊन झोपली होती. त्यापैकी तिचा सगळ्यात लहान असलेला सहा महिन्यांचा मुलगा जिवा याची चोरी झाली होती. सुनिताने आपला मुलगा शिवा जाग्यावर नसलेला पाहून तिच्या पायाखालची जमीनच सरकली. सर्वत्र शोधाशोध केल्यानंतर सुनिताने आपली व्यथा महात्मा फुले पोलिसांना सांगितली. महात्मा फुले पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक संभाजी जाधव, पोलीस अधिकारी प्रकाश पाटील, दीपक सरोदे आणि ढोले यांच्या पथकाने अपहत बाळाचा शोध सुरु केला. पोलीसांनी या गुन्ह्य़ात तत्परता दाखवत तपास सुरू केला. घटनास्थळावरून पोलीसांनी सीसीटीव्हीत फुटेज गोळा करून ते तपासले असता त्यात आरोपी बाळाची चोरी करीत असतानाचे चित्रीकरण सापडले. पोलीसांनी तातडीने यातील आरोपींच्या मागे पोलीस पथक लागले. आरोपी संबधित अपहत बाळाची विक्री करतील अशी भिती पोलीसांना होती. बाळाची विक्री केल्यानंतर आरोपी हाती लागणे कठीण काम असते असे पोलीसांचे म्हणणे होते. बाळ विक्रीतून आलेल्या पैशातून हे आरोपी आनल्या मूळ गावी पळून जाण्याचीही शक्यता नाकारता येत नव्हती. म्हणून पोलीस आपल्या परीने आरोपींचा कसून शोध घेत होते. इकडे संबंधित गुन्ह्यातील आरोपी बेसावध होते. हे आरोपी पोलीस आपल्या पर्यत येण्यापूर्वीच कल्याण सोडून जाण्याच्या तयारीत होते. सीसीटीव्हीत दोन चोरटे या बाळाला घेऊन जात असल्याचे दिसून आले. पोलिसांनी या चोरट्यांचा शोध घेण्यासाठी सगळी यंत्रणा कामाला लावली. मात्र त्यांचा गुन्हेगारीचा पूर्व इतिहास नसल्याने शोध घेण्यासाठी मोठे आव्हान होते. तपास करण्यास पोलीसांसमोर सीसीटीव्हीत व्यतिरिक्त कोणताही धागादोरा नव्हता. अखेर पोलिसांच्या कामी सीसीटीव्हीचे फूटेज आले. पोलीसांनी आपले खबरे कामाला लावून त्यांच्याकडे आरोपींचे फोटो दिले. पोलीस यंत्रणा आणि पोलीसांचे खबरे आरोपींच्या मार्गावर असतानाच पोलीसांच्या तपासाला यश आले. तपास पथकाला आरोपींची अचूक माहिती खब-यांकडून मिळाली. आणि आरोपी पर्यत पोहचले. भल्या पहाटे पोलीसांनी आरोपी राहत असलेल्या घरावर छापा टाकला. आरोपी साखर झोपेत असतानाच पोलीसांचा तगडा हात त्यांच्यावर पडला. अचानक पोलीसांना पाहून आरोपी गांगरून गेले. पोलीसांनी जाग्यावरच पोलीसी खाक्या दाखवताच आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी या प्रकरणी पाच आरोपींना बेड्या ठोकल्या. आंबिवलीत राहणारा आरोपी विशाल त्र्यंबके आणि दिव्यात राहणारा आरोपी कुणाल कोट यांनी त्या बाळाची चोरी केली होती. हे दोघं सीसीटीव्हीत स्पष्टपणे दिसत आहेत. या आरोपींना बाळाची विक्री करायची होती. यातून त्यांना चांगली कमाई होणार होती. हा सौदा लवकरच होणार होता. पैशासाठी काहीही करायला तयार असणारे हे आरोपी पोलीसांच्या हाती लागले म्हणून हे अपहत बाळ तिच्या आईच्या हाती लागले. काही दिवस हे बाळ आरोपी कुणाल कोट याच्या पत्नी आरतीकडे होते. त्यानंतर या बाळाला भिवंडीत राहणाऱ्या हिना मजीद आणि फरहान मजीद या जोडप्याला देण्यात आलं. या जोडप्याने दोघं तरुणांना बाळाच्या बदल्यात एक लाख रुपये देण्याचे ठरवले होते. पोलिसांनी हिनाची जेव्हा चौकशी केली तेव्हा तिने उडवाउडवीचे अनेक उत्तरे दिली. सुरुवातीला तिने मुलगा नसल्याने त्याला दत्तक घेतल्याचं सांगितलं. विशेष म्हणजे हिनाने याआधी टेस्टट्यूब बेबीने बाळाला जन्म देऊन साडे पाच लाख रुपयात विकलं होतं. यावेळी तिने टेस्टट्यूब बेबीचा प्रयोग न करता चोरलेल्या बाळ आयतंच खरेदी करुन विकायचे हे फरहान आणि हिनाने ठरविले होते. दोघे मुंबईत नेमकं कोणत्या दांपत्याला विकणार होते, याचा तपास पोलीस करत आहेत. यातून बाळ खरेदी विक्री करण्याचे मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता पोलीसांनी व्यक्त केली आहे. दरम्यान या टोळीत अजूनही काही सहकारी असण्याची शक्यता पोलीसांनी वर्तवली आहे. बाळ चोरी करुन सहजपणे चांगला पैसा हाती येतो यासाठी जास्त कष्ट ही करावे लागत नाहीत म्हणून हे काम आंम्ही करीत असल्याचे ऐका आरोपीने पोलीसांना सांगितले. आपले चोरीला बाळ पोलीसांनी मिळवून दिल्याबद्दल सुनिता राजकुमार नाथ हिने पोलीसांसमोर हात जोडून त्यांचे आभार मानले. तेंव्हा तिच्या डोळ्यात आनंदअश्रू उभे राहिले होते. असे पोलीसांनी सांगितले.

## दारूसाठी मैत्रीला त्यांनी बाजूला सारले...

२१ वर्षीय किरण मुंकद लांदे हा तरूण कराड नगरपालिकेच्या घंटागाडीवर कंत्राटी कामगारा म्हणून काम करीत होता. शुक्रवार दि.२५ जून २०२१ रोजी तो नेहमी प्रमाणे सकाळी साडेसाह ते सातच्या दरम्यान घंटागाडीवर कामाला गेला. तो दुपारी परत कामावरून परत येऊन जेवन करून घरातून बाहेर गेला. संध्याकाळी परत तो घरी आला. दरम्यान ७.०० ते ७.३०च्या दरम्यान तो परत घरतातून बाहेर गेला त्यानंतर तो घरी परत आलाच नाही. त्याचे घरचे लोक त्याचा शोध घेत होते. परंतू त्याचा ठावठिकाणा कुठेच सापडत नव्हता. त्याच्या घरच्या लोकांनी विशेषत: त्याचा भाऊ कुंदन लांदे याने त्याला बऱ्याचवेळा फोन लावून पाहिले परंतू त्याचा फोन पण स्विच ऑफ येत होता.किरण याला दारू पिण्याचे व्यसन असल्याने कुठे तरी तो दारु पिऊन झोपला असेल असे समजून त्याच्या घरच्या लोकांनी त्या रात्री त्याचा शोध घेण्याचे थांबविले होते.मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी गोवारे येथील चौडेंश्वरी येथील मळीच्या शेत शिवारातील ओढयाच्या पश्चिमेस असणाऱ्या रस्त्यावर त्या परिसरातील लोकांना एका तरूणचा दगडाने डोके ठेचलेला आणि गुप्तीने अंगावर वार केलेल्या तरूणाचा मृतदेह दिसला.मयत तरूणाचा चेहरा हा बऱ्याच लोकांना ओळखीचा वाटत असल्याने त्यांनी जवळ जावून पाहिले असता,तो तरूण घंटागाडीवर काम करणारा किरण लांदे हा असल्याचे त्याच्या लक्षात आले.त्यातील एका नागरिकांने या घटनेची माहिती लगेचच मयत किरण लांदे याच्या घरच्या लोकांना दिल्यावर मयताचा भाऊ कुंदन लांदे हा घटनास्थळी आला. गोवारे येथील चौडेंश्वरी नगरातील मळी भागातील ओढच्या पश्चिमेस अणाऱ्या रस्त्याच्या बाजूला त्याचा मृतदेह पडला होता.कुणी तरी त्याचा निर्घृणपणे खून केला होता.त्याने जवळून निरखून मृतदेह पाहिला असता तो मृतदेह त्याचा भाऊ किरण लांदे याचाच होता.मयत किरण लांदे याच्या शरीरावर गुप्तीने वार केल्याच्या खुणा दिसत होत्या.तर त्याचे डोके दगडाने ठेचून त्याचे डोके फोडल्याचे दिसत होते. या घटनेची कुंदन लांदे याने कराड शहर पोलीस ठाण्याला दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली असता. त्यांना घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यात किरण लांदे याचा मृतदेह पडलेला दिसला. बाजूलाच रक्ताने माखलेला दगड आणि बाजूला दोन चार ग्लास,दारूच्या बाटल्या,आणि स्नॅक्स ही पडलेले दिसत होते. पोलीसांनी घटनास्थळाची आणि मृतदेहाची पाहणी करून मृतदेह शवविच्छेदनासाठी कराड येथील स्व. सौ.वेणुताई चव्हाण उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवून दिला. रुग्णालयात मयत किरण लांदे याच्या नातेवाईकांनी व बुधवार पेठेतील नागरिकांनी मोठी गर्दी करून तणाव निर्माण केला. त्यावेळी पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवल्याने कोणताही अनुचीत प्रकार घडला नाही. मयत किरण लांदे याच्याविषयी पोलीसांनी त्याचा भाऊ कुंदन लांदे याचेकडून माहिती घेतल्यावर किरण याला दारू पिण्याचे व्यसन असल्याची माहिती त्यांना मिळाली.शुक्रवार दि.२५ जून रोजी किरण हा संध्याकाळी ७.३०च्या दरम्यान किरण लांदे हा त्याचा मित्र आकाश गवळी व अक्षय गवळी याच्याबरोबर दारू पिण्यासाठी गेला. त्या रात्री घरी तो घरी परत आलाच नाही,तो कायम दारू पिऊन येवून उशिरा घरी परत असल्याने घरचे लोक ही वैतागलेले होते.त्याला कितीही सांगितले तरी तो दारू पिण्याचे कमी करत नव्हता.आकाश गवळी आणि अनिल गवळी या दोघांच्या बरोबर त्याची मैत्री असल्याने तो बहुदा दारू पिण्यासाठी त्याच्या बरोबरच बसत होता. त्याचे हे दोघे ही मित्र गोवारे येथील चौंडेश्वरी नगरातील गजानन हौसिंग सोसायटीत राहयला असल्याने त्या परिसरातच त्याचा खून झाल्याने मयत किरण याच्या भावाने या दोघांविषयी माहिती त्याने पोलीसांना दिली. घटनास्थळावरून मिळालेले धागे दोरे आणि मयताच्या भावान दिलेली माहिती यावरून पोलीसांनी किरण लांदे याचा खून त्याचा मित्र आकाश गवळी यानेच त्याच्या मित्राच्या मदत्तीने केल्याचे स्पष्ट होत होते. कराड शहर हे खून मारामारी या संदर्भात अतिशय संवेदनशील बनले असल्याने या घटनेचा तपास कराड शहर पोलीसा बरोबरच सातारा स्थानिक गुन्हे अन्वेषनचे पोलीस ही करीत होते. मोबाईल फोनच्या लोकेशनवरून घटनास्थळावरून या घटनेतील दोन संशयीत आरोपी हे पुण्याला पळून गेल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषनचे पो.निरी. किशोर धुमाळ यांना मिळाल्यावर त्यांनी या आरोपीच्या शोधासाठी गुन्हे अन्वेषनचे एक पथक पुण्याला रवाना केले. घटनेच्या अवघ्या पाच तासाच्या आतच स्थानिक गुन्हे अन्वेषणाच्या पोलीसांनी या घटनेतील संशयीत आरोपी आकाश गवळी आणि अनिल गवळी यांना पुण्यातून ताब्यात घेवून कराडला आणले.त्याच्याकडे पोलीसांनी चौकशी करून स्थानिक गुन्हे अन्वेषणच्या पोलीसांनी त्याना कराड शहर पोलीसांच्या ताब्यात दिले.कराड शहर पोलीसांनी या दोघांना बोलते केले असता त्यांनी किरण लांदे याच्या खूनाविषयी माहिती देताना सांगितले की, घटनेच्या दिवशी म्हणजे शुक्रवार दि.२५ जून रोजी सायंकाळी ७.३०च्या दरम्यान आकाश गवळी हा नेहमी प्रमाणे किरण याला भेटायला बुधवार पेठेतील त्याच्या घरी गेला होता. त्यावेळी त्या दोघात बोलता बोलता दारूचा विषय निघाल्यावर ते दोघे ही दारू प्यायला म्हणून त्याच्या घरातून बाहेर पडले. वाटेत त्यांना अनिल गवळी हा ही भेटला. तो ही त्यावेळी त्याचेबरोबर दारू पिण्यासाठी तयार झाला. ते तिघे ही गोवारे येथील चौंडेश्वरी नगरातील मळीच्या पलिकडे असणाऱ्या पश्चिमेच्या बाजूने जात ओढयाच्या रस्त्याच्या बाजूला दारू पित बसले. येताना त्या तिघांनी आपआपल्या पैशाने दारू स्नॅक्स आणि ग्लास घेतले होते.त्या तिघांनी आणलेली दारू प्रत्येकांनी आपआपल्या ग्लासमध्ये घेवून आपल्या घशाखाली ओतली. पेग वर पेग चढत होता. एक दीड क्वॉटरने त्याने नशा होणारी नव्हती. पण तिघांच्या कडेही दारूसाठी पैसे नव्हते. आकाश आणि अनिल यांना वाटले की किरण याचेकडे पैसे असतील म्हणून त्या दोघांनी त्याला आम्हाला आता दारू कमी पडली आहे. तू आणखीन एक क्वॉटर घेऊन ये. तुला उदया आम्ही परत त्या दारुचे पैसे देतो.तू आता दारूचे पैसे घाल. यावर किरण त्यांना म्हणाला मला काही आता दारू नको आहे.

मला माझी नशा झाली आहे. यावर त्या दोघांना त्याचा राग आला. आम्ही तुला तू मागशिल त्यावेळी दारु देतो आणि आता आम्हाला नशा कमी झाल्यावर आणि दारू कमी पडत असताना तुझ्याकडे दारू मागत आहे आणि तू नाही का म्हणतोस.?यावरून त्या तिघांत भांडण आणि वाद सुरू झाला. मुद्दामावरून गोष्ट गुद्दयावर आली. ते तिघे ही एकमेकांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करू लागले.यात अनिल याचा रागाच पारा चढला होता. त्याने किरण याला खाली पाडून नशेतच त्याच्या अंगावर आपल्याकडील गुप्तीने वार केले.त्याच्या शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव होऊ लागल्यावर तो ओरडत होता. तळमळत तडफडत तो घटनास्थळी पडला असतानाच आकाश याने त्याच्या डोक्यात जवळच पडलेला मोठा दगड घातला. त्यातच किरण याचा जागीच मृत्यू झाला. त्याचा मृत्यू झाल्याचे लक्षात आल्यावर ते दोघे ही भांबावले होते. त्यांना काय करावे आणि काय नको असे झाले होते. त्याच्या हातून कळत नकळत पणे किरण याचा खून झाला होता. यातून निसटण्यासाठी म्हणून ते दोघे मिळेल त्या वाहनाने त्या रात्री पुण्याला पळून गेले. त्यांनी दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी त्याना रितसर अटक करून ताब्यात घेतले. मयत किरण लांदे याचा भाऊ कुंदन लांदे याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी किरण लांदे (वय २१) रा.बुधवार पेठ याच्या खून प्रकरणी अनिल गवळी (वय २०) आणि आकाश गवळी (वय २१) रा.दोघे ही चौडेंश्वरी नगर गोवरे याच्या विरोधात कराड शहर पोलीस ठाण्यात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याना कराड येथील प्रथमवर्ग न्यायालयासमोर उभे केले असता मा.न्यायालयाने या दोघांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.

पोलीस कोठडी दरम्यान या दोघांनी ही आपला गुन्हा कबुल केला होता. या घटनेचा तपास सातारा अप्पर पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर पोलीस अधिक्षक धीरज पाटील, स्थानिग गुन्हे अन्वेषणचे पोलीस निरीक्षक किशोर धुमाळ याच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. रमेश गर्जे, पो.उप.निरी.मधुकर गुरव, पो.ना.शरद बेबले, मंगेश महाडिक, साबीर मुल्ला, नितीन गोगावले, प्रविण फडतरे, मुनीर मुल्ला, निलेश काटकर, प्रमोद सावंत, अमित सपकाळ, पो.कॉ. मयूर देशमुख, रोहित निकम, सचिन ससाणे, विशाल पवार, मोहसिन मोमीन यांनी केला. दारूच्या व्यसनात अनेक तरूण वाया गेले. तरीही अनेकांची पिण्याची सवय काही कमी होत नाही. दारू प्यायला मिळाली नाही किंवा नशा कमी झाली की मग समोरच्याबरोबर त्या कारणातून भांडण काढून त्याला संपवायला ही ते मागे पुढे पाहत नाहीत हेच या घटनेवरून दिसून येते.

05 TO 11 JULY 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 03/07/2021 9:20 PM Page 1



# आंतरजिल्हा मोटारसायकल चोरट्याला सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूरसह सात जिल्ह्यात मोटारसायकल चोरी करणाऱ्या आंतरजिल्हा चोरट्यास सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले आहे. पोलिसांनी २१ लाख ४५ हजार रुपयांचा ३९ मोटारसायकल हस्तगत केल्याची माहिती सोलापूर पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या कार्यालयाच्या आवारात आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली. नामदेव बबन चुनाडे (४८) असे मोटारसायकल चोरट्याचे नाव आहे. २०१६ मध्ये त्याने फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून आणि सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथून मोटारसायकल चोरल्या. यानंतर त्याने जेलरोड व फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून मोटारसायकलची चोरी केली. मोटारसायकल चोरण्यासाठी तो पितळी धातूचा चाविचा वापर करीत होता. सदर आरोपीने जिल्ह्यात व परजिल्ह्यात केलेल्या पुढील प्रमाणे गुन्हे उघड करण्यात आले आहेत. पुढे त्याने सोलापूर जिल्ह्यातील बार्शी शहर, वळसंग, पंढरपूर शहर, कुर्डुवाडी, अकलूज, मोहोळ, वेळापूर भागात मोर्चा वळवला. दरम्यानच्या काळात त्याने पुणे जिल्ह्यातील इंदापूर, खडक, समर्थनगर, जेजुरी, तळेगाव दाभाडे, वडगाव निंबाळकर, हडपसर, दत्तवाडी, सिंहगड, सासवड, सातारा जिल्ह्यातील सातारा शहर, लोणंद, फलटण, सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर, कोल्हापूर शहरातील लक्ष्मीपुरी, बीड जिल्ह्यातील केज व अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत परिसरात मोटारसायकल चोरी केल्या. सहा जिल्ह्यात त्याने मोटारसायकल चोरीचा सपाटा लावला. सोलापूर जिल्ह्यात मोटारसायकल चोरीचे वाढत असल्याने सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांना गुन्हेगारीचा शोध घेण्याचा सूचना केल्या. त्याच काळात पंढरपूर येथील फिरस्ता नामदेव चुनाडे कडे चोरीचे मोटारसायकल असल्याबाबत माहिती मिळाली. त्यांनी तातडीने पथक पाठवून त्यास ताब्यात घेतले. त्यानंतर केलेल्या चौकशीत त्याने अनेक गुन्ह्यांची माहिती पथकाला दिली. परंतु त्याने त्या सर्व मोटारसायकलची विक्री केलेली होती. सहा जिल्ह्यांतून वाहन हस्तगत करण्याचे आवाहन ही पोलिसांनी स्वीकारले आणि ३९ मोटारसायकल हस्तगत केले. त्या संदर्भात बोलताना पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते सांगितले. वाहन विकत घेतल्याचा हेतू तपासूनच त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच गुन्ह्यात सहभाग असल्याचा संशय आल्यास संबंधितांवरही कारवाई करण्यात येईल. सदर आरोपीस सध्या वळसंग पोलीस ठाण्याकडील गुरनं २९८/२०२१ भादंवि क ३७९ या गुन्ह्यात वर्ग करण्यात आली आहे. ही सदर कारवाई सोलापूर पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमित सिद पाटील, पोलीस हेड कॉन्स्टेबल राजेश गायकवाड, दिलीप राऊत, श्रीकांत गायकवाड, विजयकुमार भरले, सलीम बागवान, पोना हरिदास पांढरे, रवी माने, पोलीस कॉन्स्टेबल सचिन गायकवाड व केशव पवार यांनी पार पाडली आहे.

# देवणी येथे सुरू असलेले उपोषण तात्पुरते स्थगित



**देवणी/प्रतिनिधी**

आनंद जीवणे यांनी दिनांक २१ जुन पासुन देवणी नगर पंचायत समोर अमरण उपोषणास बसले होते दि.२ जुलाई रोजी उपोषण तात्पुरत्या स्वरुपात मागे घेण्यात आले. देवणी तालुक्यातील तोगरी ते तुरोरी या संबंधित कामाच्या भ्रष्ट अभियंत्यावर व गुत्तेदारावर कार्यवाही करण्यात यावी. मुख्यालयी राहत नसलेले व पगारी उचलत असलेले तालुका कृषी कार्यालयचे तालुका कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, पंचायत समितीचे अधिकारी कर्मचारी व इतर कार्यालयाचे शासकीय कर्मचारी, अधिकारी यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करून त्यांचा एक वर्षाचा पगार कोविड रुग्ण आरोग्य विभागास जमा करावे अशा विविध मागण्यासाठी उपोषणास बसले होते. या उपोषणाला पाठींबा म्हणुन काही संघटनानी पाठींबा दर्शविला होता. काँग्रेसचे नेते तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य अभय साळुंखे यांनी मध्यस्थी करुण उपोषण मागे घेण्यासाठी प्रयत्न केले व तहसीलदार सुरेश घोळवे यांच्या हस्ते लिंबु शरबत पाजवुन उपोषण माघे घेण्यात आले. यावेळी काँग्रेसचे अभय साळुंखे, काँग्रेसचे देवणी तालुकाध्यक्ष अजित बेळकोणे, जेष्ठ नेते मल्लिकार्जुन मानकरी, मानिकारव लांडगे, मल्लिकार्जुन डोंगरे, सोमनाथ कुडते, मालबा घोणसे, नामदेव मुराळे, चेतन मिटकरी, अशोक लुल्ले, बाबुराव लांडगे, आण्णाराव गीलगीले, अमोल जीवणे, लखन जिवणे, शंकर जिवणे, योगेश सजनशेट्टे श्रीमंत लुल्ले, संजय अंबुलगे, गणेश मुचलंबे, श्याम भंगे, संतोष अंबुलगे, चंदू मस्कले आदि उपस्थित होते.

# बीएचआर : हायप्रोफाईल धरपकड नाट्य?

जळगाव जिल्ह्यातील गाजलेल्या भाईचंद हिराचंद रायसोनी (बीएचआर) या मल्टीस्टेट पतपेढीवर सीबीआय छापेमारीसह हायप्रोफाईल उद्योजक भागवत भंगाळेंसह डझनभरांची धरपकड झाली. या घटनेमुळे खळबळ माजणे स्वाभाविक आहे. या कथित मल्टीस्टेट पतसंस्थेतुन काही नामचिन राजकारणी – त्यांचे काही हस्तक, काही आजी – माजी मंत्र्यांचे कृपापात्र कार्यकर्ते यांच्यावरील कारवाई सत्राने खळबळ तर उडालीच शिवाय पुन्हा एकदा खडसे – गिरिश महाजन वादाला तोंड फुटले आहे.




साधारणत: १९९० पासून महाराष्ट्रात पतपेढ्यांची गावगन्ना दुकानदारी चालवरांनी धुमाकुळ घातला. त्यात जळगाव जिल्ह्यातील काही महाभागांनी जिल्ह्याजिल्ह्यांसह राज्यभर शाखा काढण्याचा तर काहींनी राज्याबाहेर मल्टीस्टेट दर्जा मिळवण्यासह महाराष्ट्राच्या सहकार कायदा-सहकार रजिस्ट्रार यांची बंधने झुगारण्याचा धुमाकुळ घातला. बँकींग रेग्युलेशन अॅक्ट द्वारा चालवले जाणारे बँकींग क्षेत्र रिझर्व बँकेच्या नियंत्रणात असल्याने तिच्या जाचक नियमावलीपेक्षा पतपेढ्यांमधून ठेवीदारांच्या जमापुंजीची गुंतवणूक फस्त करण्यासाठी वाट्टेल तसा धुमाकुळ घालण्यात आला. जनक्षोभ उसळताच सन २००३ नंतर अनेकांचे काळे धंदे बाहेर आले. भुदरगडच्या पतपेढी चालकाने डोक्यात पिस्तुलने गोळी घालून आत्महत्या केली. राज्यभर शाखा असल्याचा टेंभा मिरवणा-या पतपेढीच्या एका मॅनेजरने पुण्यात आत्महत्या केली. जळगाव जिल्ह्यात मुख्यालय असलेल्या पतपेढीच्या पुणे शाखेत ही भिषण घटना घडल्याने संचालक मंडळावर खूनाचा गुन्हा नोंदवण्याची मागणी झाली. जळगाव जिल्ह्यात राज्यभर शाखा काढण्याची परस्परांसोबत स्पर्धा करण्यात दोन पतपेढ्या सुमारे हजार-बाराशे कोटींच्या ठेवी जमवल्याच्या बाता मारत असतांनाच जामनेर तालुक्यातून उगम पावलेल्या भाईचंद हिराचंद रायसोनी अर्थात बीएचआर मल्टीस्टेट पतपेढीने त्या दोघांना मागे टाकले. मल्टीस्टेटचा दर्जा केंद्रीय रजिस्ट्रार मिळवून महाराष्ट्राचे सहकारी नियंत्रण खिशात घातले. वाट्टेल त्या नावाने ठेवी स्विकारुन कोट्यावधीच्या काळ्या पैशाला आश्रय दिला. बीएचआर च्या पुण्यातील घोले पाटील रोड शाखेत १६०० कोटींचा बेनामी काळा पैसा जमवण्याचा उद्योग एका तक्रारीनंतर बाहेर आला. त्यानंतर या संस्था चालकांवर राज्यभरात सुमारे ७५ ते १०० गुन्हे नोंदवले गेले. या संस्थेतून कोट्यावधीचे कर्ज घेतल्याचे देखावे करुन काही जणांनी सोन्या चांदीची खरेदी विक्रीची दुकाने टाकली. काहींनी ठेकेदारीची दुकाने मांडली. ही संस्था मनीलाँड्रींगला हातभार लावते. अशा प्रकारचा आरोप आहे. बीएचआर प्रकरणात माजी मंत्री आ. गिरीश महाजन यांचे डावे-उजवे हात समजले जाणारे सुनिल झंवर, ठेकेदारीत धुमाकुळ घालणारी जामनेर गँग म्हणून ओळख मिरवणरी काही मंडळी आता पुणे पोलिसांच्या कारवाईच्या कचाट्यात सापडली असे धरपकड झालेल्यांच्या नावावरुन दिसते. त्याला खडसे – महाजन वादाची किनार आहे. जळगाव भाजपा आमदार सुरेश भोळे यांचे जवळचे नातेवाईक भागवत भंगाळे यांच्यावर कारवाई झाल्याने माजी मंत्री एकनाथराव खडसे कुणासाठी जळगाव मतदारसंघ मोकळा करु पाहतात त्याची चर्चा सुरु झाली आहे. नाही तरी भंग़ाळे हॉटेलींग – लिकर – गोल्ड इंडस्ट्रीजमधील कोट्यावधीच्या कथित उलाढालीवर अनेकांची मेहरनजर होतीच. भंगाळे गृप ऑफ इंडस्ट्रीज मधे लकीमॅन म्हणून भागवत भंगाळे ओळखले जातात. त्यांच्या निरागसपणात अनेकांना राजकीय स्पर्धक दिसू लागल्याचे म्हणतात. याच दृष्टीकोनातून सुमारे पंधरा वर्षापुर्वी त्यांच्यावर सुपारी हल्ला प्रयोग करुन त्यांच्या परिवारास चुप बसण्याचा संदेश देण्यात आला होता. बीएचआर प्रकरणात भागवत भंगाळे य आंचा नेमका रोल तो काय? ते पुढील काही दिवसात स्पष्ट होईल. काही आजी माजी मंत्री, आमदार – खासदार यांची लेटरहेड ज्यांच्याकडे आढळली त्यांना आजवर कोण संरक्षण देत आहे? याचीही चर्चा आहे. शिवाय पोलिस व महसुल प्रशासनाने आयोजीत केलेल्या संगीत रजनी व खान्देश महोत्सव या कार्यक्रमांना चौकशीकामी ताब्यात घेण्यात आलेल्या मंडळींनी किती देणग्या दिल्या आहेत याचा देखील शोध घेतला जावा असे म्हटले जात आहे.

# एमआयटीच्या सुपरस्पेशालीटी दंत रुग्णालयाचा शुभारंभ

**लातूर/प्रतिनिधी**

सध्या जगभरात कोरोनाच्या पार्श्र्वभूमीवर मानवी आरोग्यावर अत्यंत गुंतागुंतीचे विविध प्रकारचे आजार उद्भवत आहेत. कोरोनाग्रस्त रुग्णांना व इतर सामान्य रुग्णांना क्लिष्ठ अशा मुखरोगांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत तज्ज्ञांच्या सल्ल्याने वेळीच प्रतिबंधात्मक उपचार घेणे गरजेचे आहे. येत्या काळात उद्भवणाऱ्या मुख व दंत रोगांना सामोरे जाण्यासाठी एमआयटीचे सुपरस्पेशालीटी दंत रुग्णालय लातूरसह परिसरातील रुग्णांसाठी आधार ठरेल असे प्रतिपादन एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांनी केले. येथील एमआयटीच्या एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या सुपरस्पेशालीटी दंत रुग्णालयाचा कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते फित कापून शुभारंभ करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांबळे, कृत्रीम दंतशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अजित जानकर, दंत शल्य चिकित्सा शास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनंदा गडाले, मुख व शल्य चिकित्सा शास्त्र विभाग प्रमुख डॉ. सिराज बादल, मुख औषध वैद्यकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी सुलतानपुरी, सार्वजनिक दंत आरोग्य विभाग प्रमुख डॉ. अश्रि्वनी बिरादार यांची प्रमुख उपस्थिती होती. दातांचे आरोग्य राखण्यासाठी निरोगी जीवनशैली अवलंबणे अत्यंत आवश्यक आहे. दात हे प्रत्येकासाठी महत्वाचे असून स्पष्ट बोलण्यासाठी तोंडात निरोगी दात असणे आवश्यक आहे. आपण सेवन केलेले अन्न व्यवस्थित चावून योग्य प्रकारे पचवण्यासाठी दातांची भूमीका महत्त्वाची असते. त्यामुळेच निरोगी दात हे सुदृढ आरोग्याचे लक्षण आहेत. दातांच्या आरोग्यासाठी नियमितपणे दात व तोंडाची स्वच्छाता राखणे गरजेचे असून निरोगी हिरड्यांसाठी आहारात गाजर, काकडी, मुळा, पेरु, लिंबु, शेप यांचे सेवन गरजेचे असल्याचे सांगुन यावेळी यावेळी पुढे बोलताना डॉ. हनुमंत कराड म्हणाले की, मुख व दंत रोगांवरील उपचाराकरीता दंत शाखेतील विविध विषयाचे उच्च शिक्षीत तज्ज्ञ या सुपरस्पेशालीटी रुग्णालयात सेवा देणार असून दातांच्या रुग्णांवर तात्काळ व दर्जेदार उपचार करणे हे या रुग्णालयाचे लक्ष आहे. या रुग्णालयात प्रामुख्याने मुख व दंतरोग तपासणी, मुख कर्करोग तपासणी, तोंडात उद्भवणारे पांढरे-लाल चट्टे व इतर संसर्गावरील उपचार तज्ज्ञ डॉक्टरांकडून करण्यात येणार असून अद्यावत उपकरणांव्दारे गंभीर आजारांचे अचूक निदान करण्यात येईल. पडलेल्या दातांसाठी दंतरोपन हा आधुनिक उपचार (खाश्रिरपीं), दातांवरील कॅप (उशीराळल ईळवसशी), सर्व खराब झालेल्या दातांचे संपूर्ण पुन:र्वसन (र्त्रीश्रश्र चेीींह ठशहरलळश्रळीरींळेप), सुंदर हास्यासाठी दातांचे सौंदर्यीकरण (डाळश्रश उश्रीळसपळपस), संपूर्ण दात नसलेल्या ज्येष्ठ रुग्णांसाठी संपूर्ण कवळी बसविण्याचे उपचार तज्ज्ञ डॉक्टरांकडून करण्यात येतील. वेड्या-वाकड्या येणाऱ्या दातांकरीता अद्यावत उपकरणाव्दारे व ऑर्थोडोन्टिक्स तज्ज्ञाव्दारे निदान करुन दातावरील क्लिप बसवून योग्य उपचार करण्यात येणार असून अनेक व्यसनांमुळे तोंडामध्ये उद्भवणाऱ्या अनेक आजारांवर, तोंडातील गाठींवर, अपघातात मार लागून तुटलेल्या जबड्यावर आणि जबड्यात आडकलेल्या अक्कल दाढांवरील सर्व शस्त्रक्रिया तज्ज्ञ व अनुभवी मुख शल्य चिकित्सकांकडून तातडीने करण्यात येणार आहेत.



झिजलेले, किडलेले, खराब झालेले दात वाचवण्यासाठी व पुर्ववत करण्यासाठी रुटकॅनल उपचार, लेझर मायक्रोस्कोप रोट्री या अत्याधुनिक उपकरणाव्दारे व दर्जेदार मटेरिअलच्या माध्यमातून उपचार करण्यात येतील. त्यासोबतच लहान मुलांच्या (१ ते १४ वर्ष) दुधाच्या दातांवरही बाल दंत रोग तज्ज्ञाकडून सबंधीत उपचार करण्यात येणार आहेत. ज्या मुलांच्या दातांवर उपचार करणे अवघड असते अशा बाल रुग्णांसाठी अत्याधुनिक उपकरणाच्या माध्यमातून संपूर्ण भूलीव्दारे व सिडेशन (अर्धवट भूल) या उपचार पध्दतीच्या आधारे उपचार करण्यात येतील. हिरडीतून पु येणे, वास येणे असा त्रास असल्यास अशा रुग्णांसाठी हिरड्यांची लेझर शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध आहे. तसेच दाताचे आरोग्य व घ्यावयाची काळजी याबाबत रुग्ण व नातेवाईकांचे तज्ज्ञांमार्फत समुपदेशन करुन माहिती देण्यात येणार असल्याचे डॉ. कराड यांनी शेवटी सांगीतले. यावेळी बोलतांना प्राचार्य डॉ. सुरेश कांबळे म्हणाले की, सर्व अद्यावत सोयींनिशी एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे सुपरस्पेशालीटी दंत रुग्णालय सकाळी ९ ते सायंकाळी ७ या वेळेत कार्यरत राहणार असून लातूरसह ग्रामीण भागातील रुग्णांसाठी उपयोगी ठरणार आहे. प्रत्येक रुग्ण हा त्रास असल्याने रुग्णालयात येत असतो. त्यामुळे येणाऱ्या प्रत्येक रुग्णांवर योग्य उपचार करण्याचे काम डॉक्टरांनी प्रामाणीकपणे व नैतिक जबाबदारी म्हणून करावे. आलेल्या रुग्णांवर तात्काळ उपचार करुन रुग्णाच्या वेदना कमी करण्यासाठी डॉक्टरांनी तत्पर राहावे असे ते म्हणाले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. अजित जानकर यांनी केले तर आभार डॉ. सिराज बादल यांनी मानले. यावेळी डॉ. अमोल डोईफोडे, डॉ. सुमित शहा, डॉ. प्रविण मरुरे, डॉ. श्रीकांत केंद्रे, डॉ. गौरी उगाले, डॉ. वर्षा सांगळे, कार्यालयीन अधिक्षक बळीराम हांडगे यांच्यासह एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व रुग्णालयातील प्राध्यापक, डॉक्टर, शिक्षकेत्तर कर्मचारी व रुग्ण उपस्थित होते.

## उदगीर तालुक्यात अवैध डिझेलची विक्री

**देवणी/प्रतिनिधी**




देवणी उदगीर तालुक्यात अवैध डिझेलची मोबाईल वाहनांद्वारे विक्री होत आहे. या बाबतीत प्रशासन बघायची भूमिका घेत आहे. देवणी तालुक्यात तळेगाव, कारखाना परीसर, सय्यदपूर, कानेगाव, या परिसरात तर उदगीर तालुक्यातील देवर्जन भागात अवैधरीत्या फिरत्या वाहनांच्या सहाय्याने डिझेलची विक्री होत असताना ही तहसीलदार व पोलिस यंत्रणा कोणत्याही प्रकारची कारवाई करीत नाही. सदरच्या मोबाईल वाहनाकडे कोणत्याही प्रकारचे ज्वलनशील पदार्थ वाहतूक करणे, त्याचा साठा करणे, विक्री करणे, वजने मापे प्रमाणात अशा कसल्याच प्रकारचे सर्टीफिकेट नाहीत गर्दीच्या ठिकाणी व चौकात डिझेल विक्री करता येत नाही व त्या ठिकाणी स्पोट होऊन कांही जिवीतहाणी झाली तर यास कोण जवाबदार, या सर्व बाबतीत पोलीस यंत्रणा गप्प आहे. या वाहनांवर आणि संबंधित पेट्रोल पंपाचा परवाना रद्द करावे याकडे जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

# चोरीस गेलेले दिड लाखांचे सोन्याचे दागिने सोलापूर पोलिसांनी केले सुपूर्द

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर तालुका पोलीस स्टेशन हददीतुन ६ जून २०२१ रोजी तक्रारदार महिला रूक्मीनी उर्फ अंबीका भारत धोत्रे, रा.चिचोळी एम.आय.डी.सी, ता.मोहोळ ह्या रिक्षा मधुन केगाव ते पाकणी फाटा, पाकणी असा प्रवास करत होते. प्रवासादरम्यान त्यांचे लक्ष विचलीत करून पर्स मधुन १,६०,०००/- रू.चे दागीने तसेच ४२,५००/- रोख रक्कम अनोळखी चोरट्या महिलेने चोरून नेले होते. त्यावरून सोलापूर तालुका पोलीस स्टेशन गु.र.न. ४११/२०२१ भादवि कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून पो. नि. फुगे यांनी व त्यांच्या पथकाने गुन्हा करण्याच्या पद्धतीवरून महिला आरोपीस अटक करून तीच्याकडुन गुन्हयात चोरलेला १ लाख ७८ हजार ८७५ रू. किमतीचा मुददेमापैकी त्यामध्ये मौल्यवान दागीने रोख रक्कम हस्तगत करण्यात आले होते. सदर गुन्हयाचा तपास सपोफौ राठोड यांनी केला असुन महिला आरोपी विरूध्द् पुरावा हस्तगत करून ६ दिवसाच्या आत मा. कोर्टात दोषारोप पत्र दाखल केले आहे. फिर्यादी सौ. धोत्रे यांनी दागीने ओळखले आहेत. मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, कोर्ट, सोलापूर यांच्या आदेशाप्रमाणे सदरचे दागीने व रोख रक्कम तक्रारदार सौ. धोत्रे यांना दि. १ जुलै रोजी परत करण्यात आले आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक तेजसवी सातपुते, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सो, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, अरूण फुगे, सपोफौ बाळु राठोड, सपोफौ विवके सांजेकर, मपोहेकॉ वैशाली कुंभार नेमणुक सोलापूर तालुका पोलीस ठाणे यांनी केली आहे.



## संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेण्याचे समितीचे आवाहन

**देवणी/प्रतिनिधी**



संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन तालुका निराधार समितीचेअध्यक्ष वैजनाथ लुल्ले यांनी केले आहे. श्रावण बाळ राज्य सेवा योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धपकाळ योजना, विधवा, अपंग, दुर्धर आजाराने ग्रस्त असलेले रूग्ण, परित्यक्ता, वेश्या व्यवसायातुन मुक्त झालेल्या महिला, दारिद्र्यरेषेखालील कुटुंब यांच्यासाठी शासनाने विविध प्रकारच्या योजना सुरु केल्या आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अनेक लाभार्थी कोसो दुर आहेत. कार्यकर्त्यांनी असे लाभार्थी शोधून त्यांना लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावे. योजनेचा लाभ घेण्यासाठी काही अडचणी येत असल्यास समितीच्या सदस्यांना भेटुन त्या अडचणी दुर करून घ्यावे. लाभार्थीचे अर्ज म्हणावे त्या प्रमाणात मंजुरीसाठी येत नसल्याचेही त्यांनी सांगितले. जास्तीतजास्त लाभार्थ्यांना लाभ मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे समितीचे चेअरमन वैजनाथ लुल्ले यांनी क्राईम संध्याशी बोलताना सांगितले.

५ जुलै


# ।। जीवेत शरदः शतम् ।।

आमचे मार्गदर्शक आणि प्रेरणास्थान तथा
महाराष्ट्रातील लोकप्रिय साप्ताहिक 'क्राईम संध्या'चे संपादक

# मा. श्री. लक्ष्मणराव शंकरराव पाटोळे

आपणास वाढदिवसानिमित्त
उदंड आयुष्याच्या अनंत
# शुभेच्छा !









अनिलराज रोकडे
अध्यक्ष
वसई विरार महानगर पत्रकार संघ

ॲड. अनिल सांडभोर
(निवृत्त डीवायएसपी)

राम शंकरराव पाटोळे
(सहसंपादक, लातूर)

गणेश चव्हाण
(कार्यकारी संपादक)

सोनू जाधव
(सहसंपादक, मुंबई)

किशोर साटम
(पत्रकार, वसई)

रूपेश वाढे
(पत्रकार, वसई)

अनंता पाटील
(सल्लागार)

विजय खेतले
सचिव
वसई विरार महानगर पत्रकार संघ



ललितकुमार खरे
(पत्रकार, जळगाव)

शकिल मणियार
(पत्रकार, देवणी)

शिवाजी मोरे
(पत्रकार, औसा)

रवि वाघमारे
(पत्रकार, परभणी)

बसवेश्वर डावळे
(पत्रकार, उद्गीर)

लक्ष्मण उजगरे
(पत्रकार, परभणी)

शंकर सोनावणे
(पत्रकार, लातूर)

हामिद शेख
(छायाचित्रकार, लातूर)

मच्छींद्र चव्हाण
(पत्रकार, वसई)



संजय शिंदे
(पत्रकार उस्मानाबाद)

अबेदखॉं बागवान
(पत्रकार, सोलापुर)

अमर करकरे
(पत्रकार, लातूर)

तैसिफ सैय्यद
(पत्रकार, ता. अहमदपुर)

वसंत कांबळे
(पत्रकार, ता. औसा)

फिरोज शेख
(पत्रकार, अहमदपूर)

रवि शेट्टी
(पत्रकार, नालासोपारा)

इरप्पा बोरीकरजगी
(पत्रकार, सोलापुर, जिल्हा)

संजय लांडगे
(पत्रकार, वाडा)



शिरीष वानखेडे
(पत्रकार, कल्याण)

राजाराम ओव्हाळ
(पत्रकार, विरार)

राजेंद्र वेदांते
(पत्रकार, नवी मुंबई)

रवि शिंदे
(पत्रकार, भिवंडी)

प्रेमशंकर गुप्ता
(पत्रकार, विरार)

अलताफ शेख
(पत्रकार, जव्हार)

अभिजित निंबाजी हिरे
(पत्रकार, भिवंडी ग्रामीण)

मोहन कुंभार
(पत्रकार, कोल्हापुर)

परमेश्वर गडदे
(पत्रकार, मुंबई)

CMYK